पुणे शहर पोलीस

# दर्पण

ऑगस्ट २०१९

# अभिप्राय...

## स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे शहर

### दर्पण पुस्तीका अभिप्राय

१)पोलीस कर्मचारी यांचे संपुर्ण नाव : गणेश सुभाष खांडेकर

२)पदनाम : पोलिस शिपाई

३)बक्कल नंबर : 8814

४)नेमणुकीचे ठिकाण / पो स्टे : स्वारगेट पो.स्टे. पुणे

५)दर्पण पुस्तीकेबाबत आपला प्रतिक्रीयात्मक अभिप्राय/मत -

दर्पन या पुस्तकातील माहिती पोलिसांसाठी खुप छान लिहिलेली आहे, या पुस्तकात पोलीस खात्याबद्दलची माहिती वाचायला मिळत तसेच पोलिसांनी केलेली काम यांची माहिती दर्पण या पुस्तकातून अतिशय समर्पक रित्या सांगीतलेली आहे.

तसेच या पुस्तकातील माहिती ही आमच्यासाठी तसेच आमच्या कामात तिचा चांगला उपयोग होत असून ती अतिशय महत्वाची आहे.

दिनांक 24/08/2019

स्वाक्षरी [signature] PC8814

---

प्रति,

मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो,
विश्रांतवाडी पो.स्टे. पुणे शहर

प्रतिवेदक :- एम.डी. [illegible] म.पो.उप.निरीक्षक.
विश्रांतवाडी पो.स्टे. पुणे शहर.

विषय :- दर्पण पुस्तकाचे अभिप्राय बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास सादर करते की मा. पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी त्यांचे संकल्पनेतून तयार करण्यात आलेली 'दर्पण' पुस्तिकेचे आम्ही पोलीसांनी वाचन करीत आहोत. त्यामुळे आम्हाला पोलीसांनी केलेल्या चांगल्या कामगिरी बाबत माहिती मिळून त्याप्रमाणे कार्य करण्यात आम्हाला प्रोत्साहन मिळत आहे.

आम्ही [illegible] येथे पोलीस ठाण्याकडील 'दर्पण' पुस्तिका ही ठेवून असून पो.स्टे येथे येणाऱ्या अर्जदार व नागरिकांनी वाचण्यास देऊन सदर पुस्तकेमुळे नागरिकांच्या मनात पोलीसांबाबत चांगली प्रतिमा निर्माण होण्यास मदत होत आहे.

मा. सादर व्हावे

[signature]

म. पोलीस उप.निरीक्षक
वि.वाडी पो.स्टे पुणे.

# उत्कृष्ट तपास

उत्कृष्ट तपास

## पाच जणांना अटक : ८१ लाखांचा ऐवज जप्त, सोनारही झाला जेरबंद

# घरफोड्या करणाऱ्या टोळीकडून ५० गुन्हे उघड

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे शहरात घरफोडी, जबरी चोरी करून धुमाकूळ घालणाऱ्या गुन्हेगारांच्या टोळीला वानवडी पोलिसांनी जेरबंद केले. अटक केलेले चौघेही सराईत गुन्हेगार असून, त्यांच्याकडून चोरीचे दागिने विकत घेणाऱ्या सोनारालाही पोलिसांनी अटक केली आहे.

उजालासिंग प्रभुसिंग टाक (वय २७), गोरखसिंग गागासिंग टाक (वय ३१), बल्लुसिंग प्रभुसिंग टाक (वय ३०), जलसिंग राजपूतसिंग दुधानी (वय २६, सर्व रा. हडपसर), सत्यनारायण देवीलाल वर्मा (वय ४३, रा. लोणी काळभोर) अशी त्यांची नावे आहेत.

याबाबतची माहिती सह पोलीस आयुक्त रविंद्र शिसवे यांनी दिली. अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, पोलीस उपायुक्त सुहास बावचे, सहायक आयुक्त सुनील कलगुटकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक क्रांतिकुमार पाटील उपस्थित होते.

ही कामगिरी वानवडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक क्रांतिकुमार पाटील, पोलीस निरीक्षक सतीश पाटळ, आत्माराम शेरे, राजेंद्र गायकवाड, रमेश भोसले, राजू रासगे, संभाजी देविकर, योगेश गायकवाड, धर्मा चौधरी, नासिर देशमुख, सुधीर सोनवणे, नवनाथ खताळ, महेश कांबळे, प्रतीक लाडेगुडे, अनुप सांगळे, प्रवीण उतेकर, राणी खांदवे, संगीता कोतले यांनी केली आहे.

शिपाई नासीर देशमुख आणि सुधीर सोनवणे यांनी परिसरातील सर्व ४२ सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली. त्यातून संशयित गुन्हेगाराच्या हालचालीचे निरीक्षण करून ते सिकलकरी असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर या पथकातील महेश कांबळे, नवनाथ खताळ यांना गोरखसिंग टाक व उजाला टाक यांची माहिती मिळाली. त्यावरून दोघांना रामटेकडीतील अंधशाळेजवळ पकडण्यात आले.

त्यांच्याकडे केलेल्या चौकशीत त्यांचे साथीदार पुणे येथे असल्याचे समजले. तेव्हा वानवडी पोलीस ठाण्याचे सहायक निरीक्षक आत्माराम शेरे व तपास पथकातील कर्मचारी पुणे जिल्ह्यातील मोहाडी येथे गेले. त्यांनी सलग तीन दिवस सापळा लावून बल्लुसिंग टाक याला पकडले. त्या वेळी झालेल्या झटापटीत जलसिंग दुधानी याने पळवीत केलेल्या फोडी यात धावणार, कांतियार वार करून घेतले. त्या वेळी त्याच्या हातातून ब्लेड काढून घेताना शिपाई सोनवणे जखमी झाले. त्याही परिस्थितीत दोघांना पकडून पुणे जिल्हा रुग्णालयात दाखल करून पोलिसांना कल्पना दिली.




जप्त केलेल्या ऐवजासह पोलीस अधिकारी व कर्मचारी.

### आयुक्तांनी घेतली गंभीर दखल

- वानवडीमध्ये ११ ऑगस्ट रोजी घरफोडी झाली होती. उजनगामध्ये होत असलेल्या घरफोड्या, जबरी चोरीच्या गुन्ह्यांविषयी पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी मंगळवारच्या बैठकीत गंभीर दखल घेतली. त्यानंतर या घरफोड्यांच्या तपासासाठी विशेष तपास पथक तयार करण्यात आले.

### चालण्याची ढब बदलण्याची चलाखी

- या सराईत गुन्हेगारांनी चोरी करताना अगोदर रेकी करीत, शहरात आता अनेक ठिकाणी सीसीटीव्ही आहेत. सोसायट्यांमध्येही सीसीटीव्ही लावले आहेत, हे ते जाणून घेत.
- एरवी सरळ चालत असतानाच सीसीटीव्हीच्या जवळ येताच ते आपल्या चालण्याच्या पद्धतीत बदल करीत असत. त्यामुळे इतके दिवस ते पोलिसांना गुंगारा देत होते. पोलिसांनी वानवडी, हडपसर परिसरातील ४१ सीसीटीव्हींच्या फुटेजचा बारकाईने अभ्यास केल्यानंतर त्यातून घरफोडी करणारे हेच चोरटे असावेत, या निष्कर्षाप्रत पोलीस आले. त्यानंतर त्यांना जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले.

- या टोळीविरुद्ध यापूर्वी अनेक गुन्हे दाखल आहेत. उजाला प्रभुसिंग टाक याच्याविरुद्ध ३४, बल्लुसिंग टाक याच्याविरुद्ध २२, गोरखनाथ टाक याच्याविरुद्ध २५ गुन्हे, तर जलसिंग दुधानी याच्याविरुद्ध ४ गुन्हे दाखल आहेत.
- या टोळीने भोसरी एमआयडीसी येथे एकाला मारहाण करून त्याच्याजवळील मारुती सुझुकी मोटार जबरदस्तीने चोरून नेली होती. त्या व

### तीन डझन गुन्हे दाखल

इतर वाहनाची पाहणी करून आरोपी दिवसा सोसायट्यांमध्ये जाऊन अगोदर रेकी करीत, त्यानंतर बंद घरे बघतानाच फोडून आतला माल चोरून नेत असत. कोंढवा येथील घरफोडी करताना त्यांना विदेशी बनावटीचे पिस्तूल व ६ जिवंत काडतुसे चोरली होती. त्यांच्याकडून ते पिस्तूल व ६ जिवंत काडतुसे जप्त केली आहेत. या टोळीकडून ५० गुन्हे उघडकीस आणण्यात आले असून, त्यात वानवडी पोलीस ठाण्याचे ८, हडपसर ७, वाकडी, कोंढवा, भारती विद्यापीठ प्रत्येकी ३, विश्रांतवाडी, मार्केट यार्ड, डेक्कन, कोथरूड, वारजे माळवाडी येथील प्रत्येकी २, चाकण ५, शिक्रापूर, लोणीकाळभोर २ गुन्ह्यांचा समावेश आहे.

## गजा मारणे टोळीतील गुंड : माथाडीच्या नावावर मागत होते खंडणी

# व्यावसायिकाला खंडणीसाठी धमकी देणाऱ्यांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** माथाडी कामगार संघटनेच्या नावाने हॉटेल व्यावसायिकाला खंडणीसाठी धमकाविणाऱ्या चौघांना गुन्हे शाखेच्या युनीट ३च्या पथकाने अटक केली आहे. ओम तिर्थराम धर्मजिज्ञासु (वय ३०, रा. शास्त्रीनगर, कोथरुड), ललीत मारुती काकडे (वय२८, रा. वारजे माळवाडी), महेश कालीदास परिट (वय १९, रा. जयभवानी नगर, कोथरुड), योगेश प्रकाश कानगुडे (वय २४, रा. शिवकल्याणनगर, कोथरुड) अशी अटक केलेल्या चौघांची नावे आहेत. गेल्या दीड महिन्यांपासून हा प्रकार सुरु होता. या हॉटेल व्यावसायिकाकडे दरमहा १८ हजार रुपयांचा हप्ता मागत होता. ओम धर्मजिज्ञासु हा गजा मारणे टोळीचा सदस्य असून त्याच्याविरुद्ध कोथरुड पोलिसांकडे २००९ मध्ये खुनाचा एक, २०१५ मध्ये दुखापतीचा एक व भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात २०१७ मध्ये पिस्तुल बाळगल्याचा असे तीन गुन्हे दाखल आहेत. तो माथाडी कामगार संघटनेचा जिल्हाध्यक्ष असून, ललित काकडे हा उपाध्यक्ष म्हणून काम करत असल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले आहे. त्यांच्या ताब्यातून ५१ हजार रुपयांचे ४ मोबाईल फोन जप्त केले आहे.

याप्रकरणी हॉटेल व्यावसायिक कुमार झेंडे (वय २७, रा. फुरसुंगी) यांनी फिर्याद दिली आहे. झेंडे यांचे कर्वे रोडवरील करिश्मा सोसायटीत स्नॅकसेंटर आहे. या चौघांनी त्यांच्याकडे तुझ्याकडे जो माल येतो, तो आमच्या माथाडीच्या कामगारांकडूनच खाली करुन घ्यायचा अन्यथा त्या बदल्यात आम्हाला प्रत्येक महिन्याला १८ हजार रुपयांची खंडणी द्यावी लागेल. अन्यथा तू हॉटेल कसे चालवितो, हेच आम्ही पाहतो, असे म्हणून त्यांना जीव मारण्याची धमकी देत होते. या गुन्ह्याचा तपास करीत असताना पोलीस निरीक्षक राजेंद्र मोकाशी यांना माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून सुतारदरा येथे चौघांना पकडले. त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता आरोपी कोणत्याही प्रकारची हमाली करत नसल्याचे दिसून आले. तसेच त्यांनी हॉटेल व्यावसायिकाला धमकावून खंडणी उकळल्याचे समोर आले.

यापूर्वी देखील आरोपींनी अशाच प्रकारे माथाडीच्या नावाने लोकांना धमकावून खंडणी मागितली असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. त्यामुळे गुन्हे शाखेच्या वतीने नागरिकांना संपर्ककरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ही कामगिरी गुन्हे शाखेचे उपायुक्त बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक राजेंद्र मोकाशी, पोलीस उपनिरीक्षक संजय गायकवाड, राजकुमार केंद्रे, कर्मचारी अनिल शिंदे, रामदास गोणते, संदिप तळेकर, दत्तात्रय गरुड, संदिप राठोड, प्रविण तापकीर यांनी केली.

### बेकायदा गांजा बाळगल्याप्रकरणी एकास अटक




- पुणे : बेकायदा १८ हजार रुपयांचा गांजा विक्रीकरण्यासाठी जवळ बाळगल्याप्रकरणी मार्केटयार्ड पोलीसांनी एकाला अटक केली. राहुल प्रकाश बोकेफोडे (वय ३५, रा. बिबवेवाडी) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याबाबत सहाय्यक पोलीस फौजदार मोहन प्रभाकर साळवी यांनी फिर्याद दिली आहे. ११ ऑगस्ट रोजी बोकेफोडे हा मार्केटयार्ड गेट समोर पोलीसांना संशयितरित्या मिळून आला. त्याच्याकडे असलेल्या पिशवी ताब्यात घेऊन पाहणी केली असता पिशवीमध्ये ९०० ग्रॅम वजनाचा गांजा मिळून आला, असे फिर्यादीत नमूद केले आहे. या प्रकरणी बोकेफोडे याला न्यायालयात हजर केले असता, हा गांजा त्याने कोठून आणला? त्याचा कोणी साथीदार आहे का? याचा तपास करण्यासाठी त्याला पोलीस कोठडी देण्याची मागणी सरकारी वकील क्रांती कुलकर्णी यांनी केली.

### गाडीची नुकसान केल्याप्रकरणी कोठडी

- पुणे : पेट्रोल भरुन पैसे न देता निघून जाणाऱ्यांचा पाठलाग करुन त्यांना अडवून पैसे मागितल्यामुळे लाकडी दांडक्याने मारहाण करुन गाडीची नुकसान केल्याप्रकरणी येरवडा पोलीसांनी आणखी एकाला अटक केली.
- सनी अरुण अडागळे (वय २८) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी यापूर्वी एकाला अटक केली आहे. याबाबत २८ वर्षीय तरुणाने फिर्याद दिली आहे. २२ जुलै रोजी येरवडा परिसरात ही घटना घडली.
- आरोपींनी त्याच्या चारचाकीमध्ये पेट्रोल भरले. मात्र, पैसे न देता ते निघून गेले. फिर्यादी व त्यांच्या मित्रांनी दुचाकीवरुन त्यांच्या गाडीचा पाठलाग करुन त्यांना अडविले. त्यानंतर पेट्रोलचे पैसे का दिले नाही? अशी विचारणा केली. आरोपींनी फिर्यादीच्या दुचाकीला धक्का दिला.
- त्यानंतर त्यांना आरोपीकडे दुचाकीची भरपाई मागितली असता आरोपींनी फिर्यादींना लाकडी बांबूने मारहाण केली, असे फिर्यादीत नमूद केले आहे. याप्रकरणी अडागळे याला न्यायालयात हजर केले असता, गुन्ह्याच्या तपासासाठी त्याला पोलीस कोठडी देण्याची मागणी सरकारी वकीलांनी केली.

लोकसत्ता – दि. २७ ऑगस्ट, २०१९

# पीएमपी प्रवाशांकडील ऐवज लांबविणारी टोळी गजाआड

## १४ गुन्हे उघड; ४ लाख ३६ हजारांचा ऐवज जप्त

प्रतिनिधी, पुणे

**पीएमपीने प्रवास** करणाऱ्या महिला तसेच ज्येष्ठ नागरिकांकडील ऐवज लांबविणाऱ्या चोरटय़ांच्या टोळीला गुन्हे शाखेकडून अटक करण्यात आली. चोरटय़ांकडून दागिने विकत घेणाऱ्या सराफालाही अटक करण्यात आली आहे.

कृष्णा उर्फ अण्णा पोपटराव गव्हाणे (वय २४, रा. केसनंद फाटा, वाघोली), आकाश उर्फ अक्या शिवाजी अहिवळे (वय २०, रा. सूरज कॉम्प्लेक्स, धनकवडी), मंगेश सुरेश उकरंडे (वय १८, रा. केसनंद, वाघोली), सूरज किशोर सोनवणे (वय २१, रा. खराडी) आणि सराफ व्यावसायिक हुकूमसिंग राजसिंग भाटी (वय ४७, रा. खराडी) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

गेल्या काही दिवसांपासून शहरातील विविध पीएमपी बस स्थानक आणि धावत्या बसमध्ये प्रवाशांकडील ऐवज लांबविण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. चोरटय़ांनी ज्येष्ठ नागरिक तसेच महिलांना लक्ष्य करून त्यांच्याकडील दागिने लांबविले होते.

चोरटय़ांचा माग काढण्यासाठी गुन्हे शाखेकडून तपास करण्यात येत होता. शिवाजीनगर, स्वारगेट, पुणे स्टेशन भागातील बसस्थानक परिसरात पोलिसांनी गस्त वाढविली होती.

साध्या वेशातील पोलिसांचे पथक या भागात नजर ठेवून होते. सहकारनगर भागात घडलेल्या गुन्ह्य़ाचा तपास सुरू असताना आकाश अहिवळेने पीएमपी प्रवासी महिलेचे दागिने लांबविल्याची माहिती पोलीस नाईक अतुल गायकवाड आणि अजित फरांदे यांना मिळाली.

त्यानंतर अहिवळेला सापळा लावून ताब्यात घेण्यात आले. चौकशीत अहिवळेचे साथीदार गव्हाणे, उकरंडे आणि सोनवणे यांची नावे निष्पन्न झाली. अतिरिक्त पोलीस आयुक्त अशोक मोराळे, तसेच बच्चन सिंह, डॉ. शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली गजानन पवार, जयवंत जाधव, नितीन शिंदे, संजय दळवी, यशवंत आंब्रे यांनी ही कारवाई केली.

### चोरीसाठी बसमध्ये धक्काबुक्की

पीएमपी प्रवाशांकडील ऐवज लांबविणारे चोरटे अहिवळे, सोनवणे, उकरंडे, गव्हाणे धावत्या बसमध्ये महिला तसेच ज्येष्ठ नागरिकांवर लक्ष ठेवून असायचे. बसमध्ये धक्का लागल्याच्या कारणावरून ते आपसात भांडण करायचे आणि होणाऱ्या त्या गोंधळात ते प्रवाशांकडील ऐवज लांबवून पसार व्हायचे. त्यानंतर ते खराडीतील सराफ व्यावसायिक हुकूमसिंग भाटी याच्या दुकानात जाऊन चोरलेल्या दागिन्यांची विक्री करायचे. त्यांच्याकडून दागिने तसेच ३० हजारांची रोकड असा ४ लाख ३६ हजार ६०० रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला.

महाराष्ट्र टाइम्स – दि. १२ ऑगस्ट, २०१९

# चोरी झालेला मुद्देमाल मिळाला

## नागरिकांनी मानले पोलिसांचे आभार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

एकदा चोरी झाली की आपले पैसे अथवा सोने परत मिळेल की नाही, याची शाश्वती नसते. बरेचजण आम्हाला तुमची वस्तू मिळणार नसल्याचे सांगत होते. पण, पुणे पोलिसांनी ही चर्चा खोटी ठरवली. चोरी झालेला आमचा मुद्देमाल सन्मानाने परत दिला. मुद्देमाल परत मिळालेल्या नागरिकांनी अशा भावना व्यक्त करत पोलिसांचे आभार मानले. नागरिकांनीदेखील पोलिसांना सहकार्य करावे, अशी सूचना या वेळी करण्यात आली.

पुणे पोलिस आयुक्तालयांतर्गत विविध गुन्ह्यांत चोरी झालेला मुद्देमाल पोलिसांनी आरोपींना पकडून जप्त केला होता. कोर्टाच्या आदेशाने ७३ गुन्ह्यांमधील एक कोटी १८ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल शनिवारी सकाळी नागरिकांना परत करण्यात आला. त्या वेळी काही नागरिकांनी आपले मनोगत व्यक्त करत पोलिसांचे आभार मानले. या वेळी अतिरिक्त पोलिस आयुक्त अशोक मोराळे, गुन्हे शाखेचे उपायुक्त बच्चन सिंग, उपायुक्त सुहास बावचे यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मोराळे म्हणाले, 'पोलिसांनी मेहनत घेऊन केलेल्या कामगिरीमुळेच मुद्देमाल वितरणाचा कार्यक्रम होत आहे. आरोपींना पकडण्यासाठी 'सीसीटीव्ही' महत्त्वाचे ठरत आहेत. त्यामुळे नागरिकांनी सोसायट्यांमध्ये 'सीसीटीव्ही' लावावेत. लोकसहभागातून शहरात 'सीसीटीव्ही' बसविण्याचे काम सुरू असून, आतापर्यंत २८ हजार 'सीसीटीव्ही' कॅमेरे लावण्यात आले आहेत.' सहायक पोलिस आयुक्त डॉ. शिवाजी पवार यांनी सूत्रसंचालन केले. पोलिस निरीक्षक अजित लकडे यांनी आभार मानले.

### 'पोलिसांनी सर्वांचे म्हणणे खोटे ठरवले'



'माझ्या पत्नीचे मंगळसूत्र चोरीला गेले होते. पोलिसांकडे तक्रार दिल्यानंतर बऱ्याच जणांनी आता मंगळसूत्र पुन्हा मिळणे कठीण असल्याचे सांगितले. मात्र, पोलिसांनी त्या सगळ्यांचे म्हणणे खोटे ठरवत मंगळसूत्र मिळवून दिले,' असे शामसुंदर निभोरकर यांनी सांगितले. तर, आयटी इंजिनीअर असलेल्या सोपान कदम या तरुणाने 'आपला चोरीला गेलेला मोबाइल पुन्हा मिळणे अशक्य वाटत होते. यामुळे मी ती आशाच सोडून दिली होती. मात्र, एक वर्षानंतर माझा फोन सापडा असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. याबद्दल त्यांचे खूप आभार.'

महाराष्ट्र टाइम्स – दि. १२ ऑगस्ट, २०१९

# चिंच खरेदीवरून काढला दरोडेखोरांचा माग

## धायरीतील दरोड्याचा लागला छडा

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सध्या 'सीसीटीव्ही', मोबाइल फोनच्या आधारे विविध गुन्ह्यांचा तपास लावला जातो. मात्र, गुन्हेगाराकडून अशा कोणत्याही साधनांचा वापर न झाल्यास त्यांना शोधणे कठीण होते. पण, प्रत्येक

**दिशा गुन्हेगारीच्या...**

आरोपी हा गुन्हा करताना एखादा पुरावा नक्कीच सोडतो. तो पुरावा फक्त पोलिसांना शोधून काढावा लागतो. अशाच पद्धतीने धायरी येथील दरोड्याचा गुन्हा उघड झाला आहे. रायकमळा येथे राहणाऱ्या शेतकऱ्याच्या घरावर मार्च महिन्यात दरोडा पडला होता. या गुन्ह्यात पोलिसांनी चिंच खरेदीवरून आरोपींचा माग काढत कौशल्याने सर्व दरोडेखोरांना बेड्या ठोकल्या. खंडणी विरोधी पथकाने ही कारवाई केली.

सोमनाथ विठ्ठल माने (वय २६, रा. धायरी), प्रवीण विलास दोडमिसे (वय २५, रा. भुगाव, लेबर कॅम्प), सागर निलाप्पा गायकवाड (वय २३) आणि संभाजी सीताराम गोरे उर्फ शंभू (वय ३०, रा. नऱ्हेगाव) अशी अटक केलेल्या दरोडेखोरांची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 'धायरीतील रायकर मळा येथे शेतकरी विशाल वाळू पोकळे यांच्या घरी १२ मार्च रोजी दरोडा टाकला होता. या परिसरात त्यांचे एकट्याचेच घर असून, शेती व दुधाचा व्यवसाय आहे. पोकळे कुटुंबीयांचे तीन खोल्यांचे बैठे घर आहे. तर, शेजारी म्हशीचा गोठा आहे. घरात तक्रारदार विशाल, त्याचे आई, वडील, सहा वर्षांचा मुलगा आणि पत्नी असे पाचजण राहतात. १२ मार्च रोजी दरोडेखोरांनी घराचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला. विशाल यांचे आई-वडील, पत्नी यांचे हातपाय बांधून मारहाण केली. घरातील एक लाख रुपयांची रोकड, सोन्याचे दागिने असा ऐवज चोरून नेला. विशालचे वडील वाळू यांनी सकाळी गावकऱ्यांना घटना सांगितल्यानंतर दरोड्याचा प्रकार समोर आला होता. गुन्ह्याचा तपास सिंहगड रोड व गुन्हे शाखेचे पोलिस करत होते. परिसरात कोठेही 'सीसीटीव्ही' नव्हते. तसेच, तांत्रिक गोष्टींचा तपास केल्यानंतर काहीच सापडत नव्हते. खंडणी विरोधी पथकाचे पोलिस वेगवेगळ्या पद्धतीने दरोडेखोरांचा माग काढत होते.



### फ्लॅट विक्रीच्या पैशामुळे दरोडा

पोकळे यांनी त्यांचा फ्लॅट विक्री केला आहे. यामध्ये त्यांना मोठी रक्कम मिळाल्याचे आरोपींना माहीत होते. माने याने साथीदारांच्या मदतीने दरोडा टाकला. पण, पोकळे यांनी रक्कम घरी ठेवली नसल्यामुळे ती आरोपींच्या हाती लागली नाही.

### असा लागला गुन्ह्याचा छडा

गुन्ह्याच्या अनुषंगाने पोलिस पोकळे कुटुंबीयांकडे चौकशी करत होते. या वेळी दरोड्यावेळी दरोडेखोर पोकळे यांना 'ही वस्तू काढून दे, तो सोन्याचा हार कुठे आहे,' अशी विचारणा करत होते, अशी माहिती समोर आली. त्यामुळे दरोडेखोरांपैकी कोणीतरी तक्रारदार यांना ओळत असावा, असा संशय पोलिसांना आला. यानंतर पोलिसांनी त्या दिशेने तपास सुरू केला. परिसरात कोण-कोण येत होते याची माहिती पोलिस काढत असताना काही दिवसांपूर्वी चिंचा खरेदीसाठी एक व्यक्ती सतत या परिसरात येत असल्याचे समजले. त्याला पोकळे यांच्या कुटुंबीयांची थोडीफार माहिती असल्याचे समोर आले. त्यानुसार पोलिसांनी चिंच खरेदी करण्यासाठी येणाऱ्या व्यक्तीची माहिती काढण्यास सुरुवात केली. त्या वेळी ती व्यक्ती गायब असल्याचे समजले. पोलिसांचा त्याच्यावरील संशय वाढला. त्याचा माग काढणे सुरूच ठेवले. अखेर त्याचा माग लागला आणि पोलिसांनी त्या चिंच खरेदी करणाऱ्या सोमनाथ माने याला अटक केली. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने साथीदारांमार्फत पोकळे यांच्या घरी दरोडा टाकल्याचे सांगितले. त्याच्या माहितीवरून प्रवीण दोडमिसे, सागर गायकवाड आणि संभाजी उर्फ शंभू गोरे यांना अटक करण्यात आली. आरोपी माने हा गुन्हा केल्यानंतर सकाळी घटनास्थळी येऊन गेला होता. पण, पोलिसांकडून केला जाणारा तपास पाहून तो गायब झाला होता.

महाराष्ट्र टाइम्स – दि. १८ ऑगस्ट, २०१९

# चालण्याच्या लकबीने आरोपी पोलिसांच्या ताब्यात



Shrikrishna.Kolhe
@timesgroup.com
Tweet : @ShrikrishnaMT




**'कायद्याचे हात लांब असतात,' हे वचन कमीअधिक फरकाने सर्वत्र लागू होते. नवनव्या क्लृप्त्या शोधून गुन्हे करणारे गुन्हेगार आणि शिताफीने गुन्ह्यांचा तपास लावून त्यांना गजांआड करणारे पोलिस, हा घटनाक्रम नित्य सुरू आहे. अशाच काही पोलिस तपासांची रंजक माहिती देणारे सदर...**

**पुणे :** गुन्हेगार कितीही हुशार असला, तरी त्याचा माग काढण्यासाठी पोलिसांना फक्त एखादा धागा महत्त्वाचा ठरतो. शहरातील गर्दीच्या ठिकाणी पार्क केलेल्या मोपेड दुचाकींच्या डिकीत ठेवलेला मौल्यवान ऐवज चोरीला जात होता. पण, डिकीचे लॉक न तुटल्यामुळे चोरी कशी झाली, असा प्रश्न नागरिक व पोलिसांना पडत होता. शेवटी पोलिसांनी एका ठिकाणचे सीसीटीव्ही चित्रिकरण पाहिले. त्या वेळी मोपेडच्या सीटखालून हात घालून काही सेकंदामध्ये चोरट्याने ऐवज लंपास केल्याचे दिसले. सीसीटीव्ही फुटेज स्पष्ट नव्हते. मात्र, तो चोरटा एका विशिष्ट लकबीमध्ये चालताना दिसला. नेमका हाच धागा त्याच्यापर्यंत पोहचण्यास पोलिसांना उपयोगी ठरला. आठ ते दहा दिवस पाठपुरवा केल्यानंतर या चोरट्याला पोलिसांनी शिताफीने पकडले.

## 'एफडी' करणारा चोरटा

गुन्हे केल्यानंतर मिळालेला पैसा मौजमजा करण्यात बहुतांश गुन्हेगार घालवितात. मात्र, सुभाष बनपट्टे याला पकडल्यानंतर एक अजब प्रकार पोलिसांना दिसला. चोरलेल्या पैशाची बचत करून त्याने बँकेत काही रक्कम मुदत ठेव (एफडी) ठेवल्याचे समोर आले. बनपट्टे याला काहीही व्यसन नाही. त्याला फक्त ब्रँडेड कपडे आणि चांगले जेवण या गोष्टींचा शौक आहे. बाकीची रक्कम तो बचत करून त्याच्या 'एफडी' करत असल्याचे समोर आले आहे.



शहरातील बँका, शॉपिंग मॉल, मार्केट अशा गर्दीच्या ठिकाणी ॲक्टिव्हा, ॲक्सेस, ज्युपिटर अशा मोपेड दुचाकीतून सोन्याचे दागिने, रोख रक्कम, फोन, अशा वस्तू चोरीच्या घटना घडत होत्या. गुन्हे शाखा युनिट चारचे कर्मचारी रमेश चौधर आणि नीलेश शिवतरे यांनी समर्थ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका चोरीच्या ठिकाणचे सीसीटीव्हीचे चित्रिकरण पाहिले. त्या वेळी त्यांना चोरटा मोपेड दुचाकीचे लॉक न तोडतादेखील सीटखालून हात घालून मौल्यवान ऐवज चोरत असल्याचे दिसून आले. चोरटा काही सेकंदामध्ये ही चोरी करत असल्यामुळे कोणालाच काही समजत नव्हते. सीसीटीव्ही फुटेज मिळाले असले, तरी त्यामध्ये त्याचा चेहरा स्पष्ट दिसत नव्हता.

गुन्हे शाखा युनिट चारचे पोलिस निरीक्षक अंजुम बागवान, उपनिरीक्षक विजय झंजाड, रमेश चौधर, सचिन ढवळे, भालचंद्र बोरकर, शंकर संपते यांच्या पथकाने सीसीटीव्ही चित्रिकरणात दिसणाऱ्या या आरोपींचा शोध सुरू केला. चेहरा स्पष्ट दिसत नसल्यामुळे या व्हिडिओचा अभ्यास केला. त्या वेळी चोरटा एका विशिष्ट लकबीमध्ये चालत असल्याचे दिसले. हा व्हिडिओ काही खबऱ्यांना दाखविण्यात आले. आठ ते दहा दिवस सतत पाठपुरावा केला. त्या वेळी चालण्याची ही लकब रेकॉर्डवरील आरोपी सुभाष उर्फ बाबा लक्ष्मण बनपट्टे (वय ४०, रा. जय मित्र मंडळाजवळ, वडारवाडी) याची असल्याचे लक्षात आले. शेवटी खबऱ्यांनीदेखील व्हिडिओत दिसणारा आरोपी हा बनपट्टे असल्याचे सांगितले. त्यानंतर बनपट्टेचा शोध सुरू करण्यात आला. त्याचा वावर शहराच्या मध्यवस्तीमध्ये असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्याला अटक करण्यात आली.

बनपट्टेकडे तपास केल्यानंतर त्याने १६ गुन्हे केल्याचे तपासात आढळून आले. त्याच्याकडून चार लाख २७ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. बनपट्टे हा रेकॉर्डवरील आरोपी आहे. त्याने शहरात पूर्वीदेखील अशा प्रकारचे गुन्हे केले असून, २०१५मध्ये तो जामिनावर बाहेर आला होता. पोलिसांनी चौकशीसाठी घेतल्यानंतर फिट आल्याचे नाटक करायचे, तोंडातून फेस काढायचा असे प्रकार तो करत होता.

## अशी करायचा चोरी

शहरात मोपेड दुचाकीची डिकी बनावट चावीने उघडून चोऱ्या होत होत्या. पण, सुभाष बनपट्टे हा काही सेंकदात डिकीचे कोणतेही लॉक न तोडता शिताफिकोने दुचाकीच्या सीटखालील फटीतून आतमध्ये हात घालून मौल्यवान ऐवज चोरत होता. डिकीचे लॉक उघडले किंवा तुटले नसताना चोरी झाल्याने नागरिकांबरोबरच पोलिसही आवक होत. बनपट्टे चोरीसाठी गर्दीच्या ठिकाणी रस्त्यावर पार्क केलेल्या मोपेड दुचाकी निवडत असे.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २७ ऑगस्ट, २०१९

# खून करणाऱ्या दोन जणांना अटक

म. टा. प्रतिनिधी, पुणे

जनता वसाहत येथे किरकोळ कारणावरून वाद झाल्यानंतर त्याची तक्रार देण्यासाठी चौकीत निघालेल्या व्यक्तीचा खून केल्याच्या आरोपावरून दोघांना दत्तवाडी पोलिसांनी अटक केली.

गणपत मारुती झगडे (वय ३२) आणि ललिता गौड (वय ३५, दोघेही रा. जनता वसाहत) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. या घटनेत नागनाथ राजाराम कदम (वय ३४, रा. गल्ली क्रमांक ९१) यांचा खून झाला होता. कदम हे त्यांची पत्नी, मुलीसोबत गल्ली क्रमांक ९१मधून घरी जात होते. त्या वेळी नागनाथ याची मुलगी काही तरी बोलली. त्यांनी आपल्याला टोमणा मारला असे आरोपी ललिलाता वाटले. त्यानंतर ललिताने आरोपी गणपत याला बोलवून घेतले. त्यांच्यासोबत वादावादी झाली. त्यानंतर नागनाथ हे चौकीत तक्रार देण्यासाठी जात असताना गणपत याने त्यांच्या डोक्यात लोखंडी पाइप घालून खून केला होता. या घटनेनंतर गणपत पसार झाला होता. त्याचा दत्तवाडी पोलिस शोध घेत होते. तो पर्वती येथील जंगलात असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. तसेच, ललिताला तिच्या घरातून ताब्यात घेण्यात आले, अशी माहिती वरिष्ठ निरीक्षक देवीदास घेवारे यांनी दिली.




### चौदा दुचाकी जप्त

पिंपरी : मौजमजेसाठी दुचाकी चोरी करणाऱ्या तीन सराईतांना गुन्हे शाखा युनिट पाचच्या पथकाने सापळा रचून अटक केली. त्यांच्याकडून सहा लाखांच्या १४ दुचाकी जप्त करण्यात आल्या असून, १२ गुन्हे उघडकीस आले आहेत.

हिमांशू उर्फ पप्या योगेश सोळंखी (वय २०, रा. गुरुद्वारा मार्ग, दिघी), निखिल उर्फ सोनू संतोष जाधव (वय २०, रा. दिघी गावठाण), आशिष उर्फ अश्या रोहिदास जाधव (वय २१, चौधरी पार्क, दिघी) अशी अटक करण्यात आलेल्या चोरट्यांची नावे आहेत.

तळेगाव दाभाडे परिसरात गस्त घालत असताना सोमाटणे फाटा येथील अन्नपूर्णा हॉटेलजवळ तिघे चोरीची दुचाकी घेऊन थांबले असल्याची माहिती गुन्हे शाखा युनिट पाचचे कर्मचारी फारुख मुल्ला आणि धनंजय भोसले यांना मिळाली होती. त्यानुसार गुन्हे शाखेच्या पथकाने परिसरात सापळा रचला. पोलिसांना पाहून पळण्याच्या तयारीत असतानाच पथकाने त्यांना शिताफीने ताब्यात घेतले. या आरोपींनी तळेगाव दाभाडे, भोसरी, दिघी, फरासखाना, विमानतळ, हडपसर, वडगाव मावळ पोलिस ठाण्याच्या हद्दीत केलेल्या दुचाकीचोरीच्या १२ गुन्ह्यांची कबुली दिली. त्यांच्याकडून सहा लाख रुपये किमतीच्या १४ दुचाकी हस्तगत करण्यात आल्या आहेत. मैत्रिणीसोबत फिरायला जाण्यासाठी गाडी नसल्याने, तसेच मौजमजेसाठी दुचाकी चोरल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक विवेक मुगळीकर, उपनिरीक्षक नीलेश बोडके, कर्मचारी धनंजय भोसले, फारुख मुल्ला, मयूर वाडकर, शनराज किरणारे, स्वामीनाथ जाधव, संदीप ठाकरे, दत्तात्रय बनसोडे, भरत माने, राजकुमार ईंघारे, ज्ञानेश्वर गाडेकर, शामसुंदर गुट्टे यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

**Pune Mirror** - 11 August, 2019

# Cops bust gang for duping finance cos of ₹4.5 crore

## They would create a sale deed of a house and front a bogus person with fake identity to acquire a home loan; several non-banking institutions from city were cheated

Gunwanti.Paraste
@timesgroup.com
TWEETS @gunwantimirror

Vimantal police have busted a gang who cheated several financial institutions to the tune of Rs 4.47 crore, by taking loans under the name of bogus persons. The case was registered last year in this regard, and Vimantal police have now arrested Paras Sudhir Shah (38), Bhaskar Punjabrao Kadaskar (25), Hemant Prabhakar Gadgil (49) and Pralhad Prakesh Charya (45), while few other members are still absconding.

The modus operandi of the gang included finding individuals who were in dire need of money and were willing to sell their homes. The gang would hunt such people and include them into their plan. They would approach such persons and promise them to clear the loans on their house and buy the house as well.

The needy folk would then give in to the offer and become a part of the criminal activity. The gang would create a sale deed with the homeowner they had found and fronted a bogus person with a fake PAN. Using this sale deed, they would then apply for a home loan under the bogus person's name. The loan would generally get approved and after a few days, the gang would present all the involved accused in the scam in front of the financial institutions to get money in the bank account.

The scam came to light after 43-year-old Mahesh Sonani filed a complaint with the Vimantal police station. The complainant is the regional manager of IndoStar Capital Finance Ltd, one such institution that the gang cheated. Other targets of the gang include Dhan Varsha Investments Pvt Ltd, Capital First Ltd, and Axis Bank.

Talking to *Mirror*, assistant police inspector Muralidhar Khokale said, "This gang's trick is to target those persons who have a bungalow or a row house, whose cost would be in crores. They would look for a homeowner in need of money and is ready to sell the home. They would assure the homeowners that they will help them clear the home loan. They would create a bogus PAN card, identity proof, and a bogus guarantor as well."

The gang has duped IndoStar Capital Finance Ltd of Rs 1.42 crore, Dhan Varsha Investments Pvt Ltd of Rs 1.28 crore, Capital First Ltd of Rs 1.56 crore and Axis Bank of Rs 1.65 crore. All these accused would never mention their original names and always used fake identities to carry out transactions.





The accused (left to right) Pralhad Charya, Bhaskar Kadaskar and Hemant Gadgil

PuneMirror - 31 August, 2019

# Gang duping people with promise of real American dollars nabbed

## Four accused hailing from UP, Bihar caught in a trap and remanded in police custody

Gunwanti.Paraste
@timesgroup.com
TWEETS @gunwantimirror

A small quartet going around duping people in the name of providing them with US dollars (USD) at a cheaper rate has been nabbed by Khadki police as of Thursday. The four accused were produced in court on Friday and remanded to police custody for five days.



(Above, L-R) Accused Kabir, Mustafa, Salman and Nasima Shaikh; (below) the cops said they recovered 1,673 USD notes mostly in the form of $20 bills

The complainant, identified as cab driver Kishor Shantaram Garud (29), a Kothrud resident, had submitted a complaint about being duped by them on August 21 this year at Khadki police station (PS).

The accused have been identified as Kabir Salim Shaikh (29), Mustafa Shahwali Shaikh (31), Salman Alam Shaikh (26) and Nasima Begum Mohmmad Mukim (48). They all hail from Uttar Pradesh and Bihar.

Police sources said earlier this year, several similar complaints had been received.



This week, cops got a tip-off that the accused would be gathering in Khadki to perpetuate the scam, and laid a trap accordingly at the designated spot to nab the gang.

In his complaint, Garud had detailed that it all began for him when he ran into the accused in Baner on August 1, when all of them were having tea at an eatery. There, the gang approached Garud and said they wanted a customer for the USD notes, showing him a specimen. According to Garud, they said one of their relatives has these notes, and gave him a contact number. When he went later to the bank to verify if the note they gave him was authentic, he came back with a positive response.

Garud said, "I got in touch with them and was called near Nashik Phata for the deal. Some days later, they changed the venue to Khadki. They told me that for Rs 1 lakh, they would give be USD worth Rs 2 lakh. They gave me a bag and told me not to open it till I got him. When I did, I just saw old newspaper bundles and soap packets. I realised I had been cheated."

Police sub-inspector Pratap Laxman Giri told *Mirror*, "On Friday afternoon, we produced the accused in court and demanded 14 days of police custody, but were given five. We are investigating the case to understand who all is involved. We also recovered 1,673 authentic USD notes, mostly in the form of $20 bills. The accused cheated a lot of people, and we are trying to find out how many, as well as who is the mastermind, since they come from different states. We are also trying to find the source of the currency."

Senior police inspector BG Misal of Khadki PS said, "The modus operandi of this gang was to target people who are easily influenced. They have targeted drivers and businessmen, amongst others. The case against them has been registered under sections 420 (cheating) and 34 (common intention) of the Indian Penal Code (IPC) and we are probing the matter further still."

# सराईत चोरट्याकडून २४ मोबाइल हस्तगत

पिंपरी, दि. १२ - उघड्या दरवाजावाटे प्रवेश करून पहाटेवेळी मोबाइल चोरी करणाऱ्या सराईत चोरट्याला सांगवी पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून १ लाख २६ हजार रुपये किमतीचे २४ मोबाइल हस्तगत केले.

रमेश ऊर्फ तिम्म्या महादेव देवकीरी (वय २२, रा. जुनी सांगवी. मूळ रा. यादगीर, कर्नाटक) असे अटक केलेल्याचे नाव आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रभाकर शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, तपास पथकातील कर्मचारी दीपक पिसे आणि अरुण नरळे यांना आरोपीबाबत माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून आरोपी देवकीरी याला ताब्यात घेतले. त्याला विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने पहाटेच्यावेळी मोबाइल चोरी करीत असल्याची कबुली दिली. त्याने शहराच्या विविध भागांतून १ लाख २६ हजार रुपये किमतीचे २४ मोबाइल चोरल्याची कबुली दिली. देवकीरी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर सांगवी आणि फरासखाना पोलीस ठाण्यात चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

# Police arrest gang of five accused of 50 burglaries

## Valuables worth ₹81 lakh have been recovered; cops hope to uncover other crimes

Pune Mirror Bureau
punemirror.feedback@gmail.com
TWEETS @ThePuneMirror

Wanawadi police have arrested five persons, including a jeweller, in a bust of illegal sale of ornaments. Cops have recovered stolen valuables worth Rs 81 lakh from their possession and it is suspected that the gang was involved in over 50 burglaries.

According to the information given by the cops, the burglaries took place in Pune and Pimpri-Chinchwad area. While investigating a similar case on August 11, policemen Sudhir Sonawane, Nasir Deshmukh, Mahesh Kamble and Navnath Khatal received a tip-off about two suspects Gorakh Singh Tak (30) and Ujala Singh Tak (27), who were arrested from Ramtekdi. Their accomplices Ballu Singh Tak (30) and Jal Singh Dudhani (26) were arrested by a police team in Dhule. Deputy police commissioner (zone-5) Suhas Bavche informed that Sonawane was injured when he went to arrest Ballu Singh, who had hidden a blade in his turban.



Police at the press meet on Tuesday informing about the arrests

Senior inspector Krantikumar Patil, in-charge of Wanawadi police station, said that more burglary cases are expected to be solved from the arrest of these persons. "We have arrested a jeweller from Loni Kalbhor who used to buy the stolen ornaments from the accused," said Patil.

Addressing a press conference on Tuesday, joint commissioner of police (law and order) Ravindra Shisve said, "Our team has recovered about 1 kg gold ornaments, 10 kg silver ornaments, utensils, Rs 3 lakh cash, six four-wheelers, one motorcycle, one foreign-made pistol and six live cartridges from their possession."

The team which carried out the investigation included assistant police commissioner (Wanawadi division) Sunil Kalgutkar, inspector (crime) Salim Chaus, assistant police inspector Asaram Shete, sub-inspector Rajendra Gaikwad and others. The team was able to trace the accused with the help of footage from closed-circuit television cameras. The accused have carried out various break-in in Bhosari, Wakad, Nigdi, Hadapsar, Bharati Vidyapeeth, Hadapsar, Bibwewadi, Market Yard, Deccan, Kothrud, Koregaon Park as well as Yavat, Shikarpur, Loni Kalbhor.

प्रभात – दि. १९ ऑगस्ट, २०१९

# आईनेच केला चिमुकल्याच्या अपहरणाचा बनाव

## गरिबीमुळे सांभाळ अशक्य, म्हणून दिले होते ओळखीच्या दाम्पत्याकडे

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १८ -** मजुरी करणाऱ्या लक्ष्मीला चार मुले व तीन मुली सांभाळता येणे कठीण झाले होते. त्यामुळे तिने दोन महिन्यांच्या बाळाला एका महिलेला दिले. मात्र, मद्यपि नवऱ्याला ही बाब कळाल्यानंतर तो मारहाण करेल, या भीतीने तिने बाळाचे अपहरण झाल्याचा बनाव केला. गुन्हा दाखल झाल्यावर पुणे लोहमार्ग पोलिसांनी आठ दिवस कसून शोधमोहीम राबविली. अखेर



लक्ष्मीची उलटतपासणी घेतली, तेव्हा तिनेच हा बनाव रचल्याचे सांगितले.

लक्ष्मी राजू उर्फ बाळू चव्हाण (वय ३५, रा. जेजुरी रेल्वे स्टेशन, मूळगाव अंकेला कोंडापूर तांडा, मेहबूबनगर, हैदराबाद) यांनी बाळाचे अपहरणाची तक्रार दिली होती. स्थानिक गुन्हे शाखेने जेजुरी ते लोणावळादरम्यान बाळाला शोधण्याची मोहीम राबविली. पोलीस निरीक्षक मौला सय्यद यांना लक्ष्मी यांच्याबाबत संशय आला. त्यांनी तिची उलटतपासणी घेतली, तेव्हा लक्ष्मीने गरिबीचे कारण देत सात मुलांना सांभाळणे अवघड झाले होते, असे सांगितले. सातव्या मुलाचे पालनपोषण चांगले होईल, या उद्देशाने त्यांनी बाळाला निर्मला बाबू साठे व बाबू भीमराव साठे (रा. शांतीनगर) यांना दिल्याचे कबूल केले. हा प्रकार पतीला समजल्यास तो मारहाण करेल, या भीतीने तिने जेजुरी रेल्वे स्थानकावरील फलाट क्रमांक दोन येथून झोळीत झोपलेल्या बाळाचे अपहरण झाल्याचा बनाव केला होता. पोलिसांनी साठे यांच्याकडून बाळाला ताब्यात घेऊन लक्ष्मीच्या ताब्यात दिले. पोलीस अधीक्षक दीपक साकोरे, अपर पोलीस अधीक्षक कविता नेरकर-पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक मिलिंद झोडगे, विशाल पाटोळे, सचिन राठोड यांनी तपास केला.

# इंजिनिअर 'लखोबा लोखंडे' अखेर जेरबंद

प्रभात वृत्तसेवा



पुणे, दि. २० - उच्चशिक्षित व आयटी कंपनीत कामाला असलेल्या एका तरुणाने पुणे, पिंपरी-चिंचवड आणि ग्रामीण भागातील नागरिकांना लाखो रुपयांचा गंडा घातला आहे. स्वस्तात दुचाकी, चारचाकी वाहने तसेच मोबाइल आणि इलेक्ट्रॉनिक वस्तू देण्याचे आमिष दाखवत त्याने पुणेकरांना लाखो रुपयांचा गंडा घातला. यानंतर तो दिल्लीला पलायन करण्याच्या तयारीत असताना त्यास मुंढवा पोलिसांनी जेरबंद केले. ही कारवाई मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळावर करण्यात आली.

जयेश संजय आडुळकर (२६) असे अटक आरोपीचे नाव आहे. घोरपडी येथे राहणारे संतोषकुमार बकाराम (३५, रा. मूळ तेलंगणा) आणि माजी सैनिक एम. एन. एस.रेड्डी (खराडी) यांची चांगली ओळख होती. यामुळे फिर्यादी बकाराम यांचे रेड्डी यांच्याकडे नेहमी येणे-जाणे होते. रेड्डी हे 'आयो रूम'चे मॅनेजर म्हणून काम करतात. दरम्यान, त्यांनी त्यांच्याकडे भाड्याने राहणाऱ्या जयेश आडुळकर यांची ओळख फिर्यादींशी करून दिली होती. त्यांनी फिर्यादीला 'नवीन बुलेट ७५ हजारांतला घेऊन देतो' असे आमिष दाखवले होते.

फिर्यादीने स्वत:साठी व मेव्हण्यासाठी २ बुलेट घेण्याची तयारी दर्शवली. त्यासाठी आरोपीने त्यांच्याकडून वेळोवेळी रोख व बॅंक खात्यात २ लाख १४ हजार २०० रुपये वर्ग करून घेतले. मात्र, पैसे घेतल्यानंतर तो मोबाइल बंद करून रूम सोडून निघून गेला.

फिर्यादीने यासंदर्भात तक्रार अर्ज दाखल केला होता. पोलिसांनी तपास हाती घेतल्यावर आरोपी आडुळकरचे बॅंक खाते, आधारकार्ड आणि पॅनकार्डच्या आधारे माहिती काढली असता, तो काळेवाडीतील ज्योतीबानगर येथे रहात असल्याचे आढळले.

पोलिसांनी त्याच्या घरी धाव घेतली असता तो तेथूनही घर सोडून गेल्याचे आढळले. दरम्यान, तो त्याचे सिमकार्ड वारंवार बदलत असल्याने त्याचा ठावठिकाणा लागत नव्हता.

दरम्यान, तो मुंबईहून विमानमार्गे दिल्लीला जाणार असल्याची माहिती पोलिसांनी मिळाली. त्यानुसार सापळा रचून त्याला अटक करण्यात आले. ही कारवाई अपर पोलीस आयुक्त सुनील फुलारी, पोलीस उपायुक्त सुहास बावचे, सहायक पोलीस आयुक्त सुनील देशमुख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक भगवान गुरव, पोलीस कर्मचारी प्रविण कांबळे, श्रीनाथ जाधव यांच्या पथकाने केली.

## आयटी अभियंता असूनही भुरटेगिरी

आरोपीने संगणक शास्त्राची पदविका घेतली असून तो एका आयटी कंपनीत कामाला असल्याचे सांगतो. काळेवाडीत त्याचे घर असले तरी तो खराडीमध्ये खोली भाड्याने घेऊन राहत होता.



फेसबुकवरून मैत्री करून त्याने अनेकांना गंडा घातला आहे. पिंपरीमध्ये त्याच्यावर एक गुन्हा दाखल आहे; तर लोणीकंदलाही एक गुन्हा दाखल होण्याची प्रक्रिया सुरू आहे. नागरिकांना विश्वास बसावा, म्हणून तो सुरुवातीला काही महिलांना दुचाकी गाडी स्वस्तात घेऊन देत होता. शोरुमला गाडीची किंमत पूर्ण भरत असे. मात्र, समोरच्या व्यक्तीकडून पैसे घेताना १५ ते २० हजार कमी घेत होता. यामुळे नागरिकांचा त्याच्यावर विश्वास बसून ते आपल्या नातेवाईकांचीही त्याच्याशी ओळख करून देत. यानंतर तो संबंधित नातेवाईकांकडून पैसे घेऊन पोबारा करत. फोर्ड एन्डेव्हर व व्हेर्ना गाड्या स्वस्तात देण्यासाठी त्याने अनेकांकडून ५ ते १० लाख रुपये घेतले आहेत. त्यांच्या बॅंक खात्यात काही महिन्यात ५० ते ६० लाखांची रक्कम वर्ग झाल्याचे प्राथमिक तपासात आढळले आहे. तो मागील ७ ते ८ महिन्यांपासून मूळ घरी गेला नव्हता, तसेच त्याच्या मैत्रीणीलाही भेटला नव्हता. फसवले गेलेले नागरिक त्याच्या घरी खेटे घालत असल्याने तो घरी जाणे टाळत होता.

**दुचाकी स्वस्तात देण्याच्या आमिषाने अनेकांना कोट्यवधी रुपयांचा गंडा**

## महिलेला लाखोंचा चुना

धनकवडीतील एका महिलेशी फेसबुकवरून मैत्री करत त्याने बहीण मानले होते. यानंतर तिला कमी किंमतीत ॲक्टिव्हा गाडी घेऊन दिली होती. यानंतर तिच्या नातेवाईकांना आयफोन मोबाइल स्वस्तात देण्याचे आमिष दाखवत ५ लाख रुपये घेतले. तसेच तिच्याकडून पैशाची गरज असल्याचे सांगत १६ तोळे दागिने घेऊन ते एकाकडे गहाण ठेवत २ लाख रुपये घेतले. हे सोने हस्तगत करण्याची कारवाई पोलिसांकडून केली जात आहे.

# गुन्हेगारांची टोळी जेरबंद

## चौघांना अटक : ८१ लाखांचा ऐवज हस्तगत

**पुणे, दि. २७** - पुणे शहर, पिंपरी-चिंचवड आणि ग्रामीण परिसरात घरफोडी, जबरी चोरी, वाहनचोरीसह विविध प्रकारचे गुन्हे करणाऱ्या टोळीस वानवडी पोलिसांनी जेरबंद केले. त्यांच्याकडून तब्बल ८१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या आरोपींकडून शहरातील तब्बल ५० गुन्हे उघडकीस आले आहेत. हे सर्व गुन्हे जानेवारपासून आजवर केलेले आहेत. यातील दोघा आरोपींना धुळ्यामध्ये बेड्या ठोकल्या. यावेळी त्याने एका पोलीस कर्मचाऱ्यावर ब्लेडने हल्ला करण्याचा प्रयत्नही केला.



गोरखसिंग गागासिंग टाक (वय ३०), उजाला प्रभुसिंग टाक (वय २७), बह्लुसिंग प्रभुसिंग टाक (वय ३०), जलसिंग रजपूत दुधानी (वय २६, सर्व रा. हडपसर) अशी अटक संशयित आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वानवडी पोलीस ठण्यासह पुणे व पिंपरी-चिंचवड शहरामध्ये मागील काही दिवसांपासून घरफोडी, जबरी चोरी, वाहनचोरी यासारखे गुन्हे घडत होते. या पार्श्वभूमीवर परिमंडळ ५च्या उपायुक्तांनी वानवडी पोलीस स्टेशनची २ पथके तपासासाठी तयार केली. त्यामध्ये संबंधित आरोपी हे रामटेकडी येथील असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार गोरखसिंग व उजाला हे दोघेजन रामटेकडी येथील अंधशाळेच्या पाठिमागे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार त्यांना ताब्यात घेतले. चौकशीमध्ये बह्लुसिंग व जलसिंग हे दोघे धुळे येथे गेले होते. पोलिसांनी धुळे येथील दंण्डेलबाबा वस्ती रेल्वे मार्गालगत सलग ३ दिवस सापला रचून त्यांना अटक केली. यावेळी झालेल्या झटापटीमध्ये बह्लुसिंग याने पगडीत ठेवलेल्या ब्लेडने स्वत:च्या छातीवर व गळ्यावर वार करून घेतले. त्याच्या हातातून ब्लेड काढून घेत असताना पोलीस शिपाई सोनवणे याच्या हाताला जखम झाली. आरोपींकडून १ किलो सोने, १० किलो चांदी, ३ लाख रोकड, चारचाकी वाहने ६ वाहने, १ दुचाकी, १ विदेशी बनावटीचे पिस्टल, ६ जीवंत काडतुसे, घरफोडीचे साहित्य असा ८१ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक क्रांतीकुमार पाटील, पोलीस निरीक्षक सलीम चाऊस, तपास पथकाचे अधिकारी राजेंद्र गायकवाड, सहायक पोलीस निरीक्षक आसाराम शेटे, सहायक पोलीस फौजदार भोसले आणि पोलीस कर्मचारी रासगे, गायकवाड, देविकर, लाहिगुडे, खांदवे, यादव, देशमुख, नवनाथ खताळ, कांबळे, सुधीर सोनवणे यांच्या पथकाने केली.

**प्रभात** – दि. २८ ऑगस्ट, २०१९

# आरोपींच्या शोधात तपासले तब्बल ४१ ठिकाणचे सीसीटीव्ही

**घरफोडीचे सुमारे ५० गुन्हे उघडकीस**

**हडपसर आणि धुळ्यातून आरोपींना बेड्या**



> विविध गुन्हे उघडकीस आणण्यासाठी सी वॉच प्रकल्प हाती घेतला आहे. त्याद्वारे जवळपास २७ हजार सीसीटीव्ही जोडले गेले आहेत. व्यापारी दुकानदार यांना त्यांच्या आस्थापनेतील सीसीटीव्ही रस्त्याबाजूला किंवा प्रथमदर्शनी भागातील चित्रीकरण होईल, असे लावण्याचे सांगण्यात आले होते. या प्रकल्पाचा पोलिसांना चांगला फायदा होत आहे. अवघ्या काही महिन्यांतच सी-वॉचमुळे तब्बल १०० गुन्हे उघडकीस आले आहेत.
>
> – **अशोक मोराळे**, अतिरिक्त पोलीस आयुक्त, गुन्हे.

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २७** - तब्बल ४१ ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासत पोलिसांनी घरफोडीचे ५० गुन्हे उघडकीस आणले आहेत. यातील दोन आरोपी हडपसर, तर अन्य दोघांना धुळे येथे बेड्या ठोकण्यात आल्या. एखाद्या चित्रपटाला शोभेल, अशी कामगिरी पोलिसांनी केली आहे.

शहरातील वाढते वाहनचोरी आणि घरफोडीचे गुन्हे उघड करण्याचे आव्हान पुणे पोलिसांपुढे होते. ते परिमंडळ पाचच्या उपायुक्तांनी स्वीकारले. त्यांनी वानवडी पोलीस ठाण्याची दोन पथके तयार केली. यातील चार पोलीस कर्मचाऱ्यांनी घरफोडीच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देत एक-दोन नव्हे, तर तब्बल ४१ ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यात त्यांना आरोपी दिसले. मात्र रात्रीच्या वेळी ते घरफोडी करत असल्याने चेहरे स्पष्ट दिसत नव्हते. तसेच सीसीटीव्हीत दिसू नये, यासाठी आरोपी वेगवेगळ्या क्लुप्त्या वापरत होते.

हे आव्हानात्मक काम वानवडी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस आयुक्त रवींद्र सिसवे, कर्मचारी महेश कांबळे, नवनाथ खताळ, नासिर देशमुख आणि सुधीर सोनवणे यांनी केले. यासाठी त्यांना शहरातील ३० पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील सीसीटीव्ही फुटेज तपासावे लागले. एकावरून दुसऱ्या फुटेजपर्यंतचा माग काढावा लागला.

अनेक फुटेज अस्पष्ट असतानाही केवळ गुन्हेगारांच्या हालचाली आणी लकबीवरून त्यांना निश्चित करण्यात आले. यानंतर संबंधित दोन गुन्हेगार हडपसर येथील अंधशाळेजवळ असल्याचे समजल्यावर त्यांना जेरबंद करण्यात आले. त्यांच्या चौकशीतून आणखी दोन आरोपी धुळे येथून अटक केले. या तपास पथकाला प्रत्येकी १० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले.

**प्रभात** – दि. २९ ऑगस्ट, २०१९

# 'त्या' चिमुकलीचा खुनी चोवीस तासांत सापडला

**पुणे, दि. २८** - पदपथावर झोपलेल्या मुलीचे अपहरण करून खून करणाऱ्यास बंडगार्डन पोलिसांनी अटक केली आहे. मुलीचे वडील व मामाने मारहाण केल्याने त्याने हे कृत्य केल्याचे प्राथमिक तपासात आढळले आहे. त्याने मुलीच्या शरीराचे चावे घेत तिला रेल्वेच्या बोगीवर आपटून जखमी केले होते. यामध्ये उपचारादम्यान तिचा मृत्यू झाला. ही घटना मंगळवारी पहाटे उघडकीस आली.

प्रथमेश गायकवाड (१९) असे आरोपीचे नाव आहे. तो मूळचा जेजुरीचा असून फिरस्ता आहे. आरोपी आणि फिर्यादीचे कुटुंब पदपथावर जवळपासच राहते. फिर्यादीच्या कुटुंबाचा आरोपी हा तोंडओळखीचा आहे. दहीहंडीच्या दिवशी फिर्यादी महिलेचा पती, मामा आणि चार ते पाच जणांनी आरोपीला मारहाण केली होती. तो त्यांच्या पालाजवळून जात असताना झालेल्या वादातून ही मारहाण झाली होती. त्याचा राग मनात धरून आरोपीने मध्यरात्री फिर्यादीच्या मुलीस पार्सल विभागाजवळच्या रेल्वे बोगीत नेले होते.

पुढारी – दि. ०६ ऑगस्ट, २०१९

# कॉलेज कॅम्पस परिसरात मोबाईल चोरी करणाऱ्याला अटक

## ८३ हजारांचे सहा मोबाईल जप्त; मौजमजा करण्यासाठी करायचा चोऱ्या; आरोपी रेकॉर्डवरील सराईत चोर

**पुणेः प्रतिनिधी**

सिंहगड कॉलेजच्या कॅम्पस परिसरातील विद्यार्थ्यांच्या वसतिगृहातून मोबाईलची चोरी करणाऱ्या अमर वैजनाथ समुकराव (वय १९, रा. पांढरगाव, गंगाखेड, परभणी) याला भारती विद्यापीठ पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

त्याच्या ताब्यातून चोरीचे ८३ हजार रुपये किमतीचे सहा मोबाईल पोलिसांनी जप्त केले आहेत. आरोपी हा रेकॉर्डवरील सराईत चोरटा असून, मौजमजा करण्यासाठी तो पाळत ठेवून मोबाईल चोरत असे. अगदी मिळेल त्या किमतीला तो मोबाईल विकून त्या पैशातून मौज करत असे. वाढत्या चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी उपनिरीक्षक महेंद्र पाटील हे गस्तीवर असताना कर्मचारी समीर बागसीराज व प्रणव सकपाळ यांना चोरीचे मोबाईल विक्री करण्यासाठी एक जण भारती विद्यापीठ परिसरात थांबला असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून अमरला ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता, त्याने आंबेगाव बुद्रुक परिसरातील सिंहगड कॉलेज कॅम्पस परिसरासह इतर ठिकाणांहून ८३ हजारांचे सहा मोबाईल चोरल्याची कबुली दिली.




नवीन चित्रपट पाहण्याचा अमरला छंद होता. त्यासाठी तो रात्री परभणीहून प्रवास करून सकाळी पुण्यात येत होता. त्यानंतर सिंहगड कॉलेजमधील वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोबाईल तो चोरी करत होता. सदरची कारवाई वरिष्ठ पोलिस निरीक्षक विष्णू पवार, गुन्हे निरीक्षक विष्णू ताम्हाणे, कर्मचारी विनोद भंडलकर, श्रीधर पाटील, गणेश सुतार, उज्ज्वल मोकाशी यांच्या पथकाने केली.

**बलात्कारप्रकरणी एकाला अटक**

मेहुण्याच्या पत्नीवर बलात्कार करणाऱ्या एकाला मार्केट यार्ड पोलिसांनी अटक केली. न्यायालयाने ८ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. याप्रकरणी २७ वर्षीय पीडित महिलेने फिर्याद दिली आहे. ६ एप्रिल २०१३ ते १२ फेब्रुवारी २०१८ दरम्यान ही घटना घडली आहे. अटक केल्याने पीडितेवर बळजबरीने अत्याचार केला असून, तिच्या सासऱ्यांनी घडलेला प्रकार कोणाला सांगितल्यास संसार उद्ध्वस्त करेन, अशी धमकी दिली आहे. त्याच्यावर तसेच महिलेचा पती, सासरे, सासू , नणंद यांच्यावर मानसिक व शारीरिक छळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**दत्तवाडीतील जुगार अड्ड्यावर छापा**

दत्तवाडी परिसरात सुरू असणाऱ्या जुगार अड्ड्यावर गुन्हे शाखेच्या युनिट दोनच्या पथकाने छापा टाकून पर्दाफाश केला आहे. या ठिकाणावरून ११ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. रोकड व जुगाराचे साहित्य असा एकूण ६ हजार ४९० रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. रविवारी मध्यरात्री पोलिसांनी १८ गुन्हेगारांची तपासणी केली असून, त्यात ८ गुन्हेगार मिळून आले आहेत. शहरातील ७४ हॉटेल्सची तपासणी केली आहे. त्यातील १२ हॉटेल्सवर खटले दाखल करण्यात आले आहेत.

**महिलेच्या कोठडीत वाढ**

उसने दिलेले पैसे मागितल्याच्या रागातून एकाचा खून केल्याप्रकरणी लोणीकंद पोलिसांनी अटक केलेल्या महिलेच्या पोलिस कोठडीत ७ ऑगस्टपर्यंत वाढ करण्याचा आदेश न्यायालयाने दिला. वैशाली मारणे ऊर्फ वैशाली वीरेंद्र ऊर्फ सारीपुत्र गायकवाड (वय ४२) असे पोलिस कोठडीत वाढ करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. या प्रकरणी यापूर्वी चार जणांना अटक करण्यात आली असून, एका अल्पवयीन मुलीला ताब्यात घेण्यात आले आहे. राजाराम गुलाब साळुंके (वय ५५) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याबाबत २४ वर्षीय तरुणाने फिर्याद दिली आहे. २ मे २०१९ रोजी मांजरी खुर्द गावाच्या हद्दीत ही घटना घडली. याप्रकरणी पोलिस कोठडीची मुदत संपल्याने वैशालीला पुन्हा न्यायालयात हजर केले असता, गुन्ह्याच्या तपासासाठी तिच्या पोलिस कोठडीत वाढ करण्याची मागणी सरकारी वकिलांनी केली.

### बापाच्या कोठडीत वाढ

पुणे : पोटच्या दोन मुलींवर बलात्कार करून पत्नीच्या मदतीने दोन मुली, एक मुलाचा गळा आवळून खून केल्याचा धक्कादायक प्रकार भोसरी परिसरात गेल्या काही दिवसांपूर्वी घडला होता. याप्रकरणी भोसरी पोलिसांनी अटक केलेल्या नराधम बापाच्या पोलिस कोठडीत ९ ऑगस्टपर्यंत वाढ करण्याचा आदेश न्यायालयाने दिला. मूळचे कर्नाटक येथील पाच जणांचे कुटुंब पुण्यात भोसरी परिसरात राहण्यास आले होते. २८ जुलै २०१९ रोजी दुपारी नऊ आणि सात वर्षांच्या दोन मुलींवर त्याने बलात्कार केला. त्यानंतर त्याने पत्नीच्या मदतीने दोन मुलींसह सहा वर्षांच्या मुलाचा गळा आवळून खून केला. त्यानंतर तिघांचेही मृतदेह नायलॉनच्या दोरीने छताला अडकविले. तिघांचा खून करून पिता बाहेर पडल्यानंतर पत्नीने आतून दाराची कडी लावून स्वतः आत्महत्या केली, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी पोलिस कोठडीची मुदत संपल्याने पित्याला पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले. आरोपीने घटना घडल्यानंतर नातेवाईकांना फोन केला होता, त्याबाबत त्यांच्याकडे चौकशी करण्यासाठी, आरोपीच्या कर्नाटक येथील मूळ गावी जाऊन चौकशी करण्यासाठी आरोपीच्या पोलिस कोठडीत वाढ करण्याची मागणी अतिरिक्त सरकारी वकील प्रमोद बोंबटकर यांनी केली. ती न्यायालयाने मान्य केली.

पुढारी – दि. ०६ ऑगस्ट, २०१९

# गावरान तूप विकण्याच्या बहाण्याने ज्येष्ठांना गंडविणाऱ्या टोळीला अटक

पुणे : प्रतिनिधी

म्हशीच्या दुधाचा चिक व गावरान तूप विक्री करण्याच्या बहाण्याने शहरात ज्येष्ठ नागरिकांना गंडविणाऱ्या बारामती तालुक्यातील टोळीला गुन्हे शाखेच्या युनिट एकच्या पथकाने अटक केली आहे. त्यांच्याकडून सात गुन्ह्यांची उकल करत दागिने, तीन दुचाकी, मोबाईल असा एकूण १० लाख ७० हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

अशोक ऊर्फ कांट्या विश्वनाथ गंगावणे (वय २७), सुनील सोमनाथ वाईकर (वय ३०, रा. विठ्ठलवाडी, ता. बारामती), नवनाथ विष्णू वाईकर (वय २२), लंकेश पोपट वाईकर (वय २२, दोघे रा. बांदलवाडी, ता. बारामती) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.



म्हशीचा चीक देण्याच्या आमिषाने लूटमार!

मागील काही दिवसांत शहर परिसरात चोरीच्या अनेक घटना

गेल्या काही दिवसांत शहरात दूध; तसेच तूप विक्रीच्या बहाण्याने काहीजण घरात शिरत; तसेच या घरातल्यांना बोलण्यात गुंतवून त्यांचा विश्वास संपादन करत. आमच्या घरी लग्न आहे. त्यासाठी सोन्याचे दागिने बनवायचे आहेत. तुमच्याजवळील दागिने दाखवा. असेच हुबेहूब दागिने तयार करून घ्यायचे आहेत, अशीही बतावणी करत. त्यानंतर आई किंवा वडील खाली थांबले आहेत. त्यांना दाखवतो म्हणून आरोपी दागिने घेऊन पसार होत होते. याप्रकरणी विविध पोलिस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले होते. समांतर तपास गुन्हे शाखाही करत होती. परिसरातील सीसीटीव्हीची पडताळणी करण्यात आली होती. त्यानुसार, आरोपींची माहिती काढली जात असताना युनिट एकच्या पथकातील योगेश जगताप, मल्लीकार्जून स्वामी व सुधाकर माने यांना माहिती मिळाली की, फसवणूक करणारे तिघे बांदलवाडी येथे आहेत. त्यानुसार, अप्पर पोलिस आयुक्त अशोक मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक दिनेश पाटील, हनुमंत शिंदे, कर्मचारी तुषार खडके, इरफान मोमीन, अमोल पवार, अजय थोरात व त्यांच्या पथकाने सापळा रचला आणि बांदलवाडी येथे तिघांना पकडले. सुनील वाईकर याच्या मदतीने गुन्हे केल्याची माहिती त्यांनी दिली. त्यानंतर सुनील यालाही पकडण्यात आले. आरोपींकडून ६ लाख ५४ हजार रुपयांचे दागिने, तीन दुचाकी, मोबाईल असा एकूण १० लाख ७० हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. आरोपी अशोक याच्यावर यापूर्वी सोने चोरीचे दोन गुन्हे दाखल आहेत.

## दूध व्यवसाय ते फसवणूक



आरोपींचा दूध व तूप विक्रीचा व्यवसाय आहे; तसेच सर्वजण एकमेकांचे नातेवाईक आहेत. बारामतीवरून ते सकाळच्या वेळी पुण्यात येत असत. ज्येष्ठ नागरिकांची घरे हेरून त्यांच्याशी तूप विक्रीविषयी बोलणी करत आमच्याही घरी लग्नकार्य असल्याचे सांगत; तसेच त्यांच्याकडून दागिने घेऊन पसार होत असत. अशा प्रकारे कोणाची फसवणूक झाली असल्यास संपर्क साधावा, असे आवाहन गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त बच्चन सिंह यांनी केले आहे.

**पुढारी** – दि. १२ ऑगस्ट, २०१९

# नागरिकांना १.१८ कोटींचा मुद्देमाल परत

## पोलिसांकडून वस्तू परत मिळाल्याचे पाहून अनेकांच्या डोळ्यात तरळले आनंदाश्रू

**पुणे : प्रतिनिधी**

चोरीच्या विविध गुन्ह्यांतील तब्बल १ कोटी १८ लाख ७० हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांच्या वतीने नागरिकांना पुन:प्रदान करण्यात आला. यामध्ये सोन्या-चांदीचे दागिने, बारा वाहने, २८ मोबाईल यांचा समावेश होता. गुन्हे शाखेचे अपर पोलिस आयुक्त अशोक मोराळे यांच्या हस्ते हा मुद्देमाल नागरिकांना देण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन पोलिस आयुक्तालयात करण्यात आले होते.



नागरिकांना त्यांचा मुद्देमाल परत करताना पोलिस अधिकारी.

७३ गुन्ह्यांतील हा मुद्देमाल नागरिकांना परत करण्यात आला आहे. अनेकदा घरात किंवा दुकानात चोरी झाल्यानंतर आपल्या वस्तू परत मिळतील की नाही याबाबत मोठी शंका असते; त्यामुळे अनेक वेळा फिर्यादी चोरी गेलेल्या मुद्देमालाच्या बाबतीत आशा सोडून देतात; परंतु पोलिसांनी विविध गुन्ह्यांचा तपास तांत्रिक विश्लेषणाद्वारे तत्काळ करत, चोरी गेलेला मुद्देमाल मोठ्या प्रमाणात हस्तगत केला; तसेच तो मूळ मालकांना तत्काळ मिळावा यासाठी न्यायालयात सतत पाठपुरावा केला. त्यानंतर हा मुद्देमाल शनिवारी नागरिकांना परत करण्यात आला.

या वेळी अनेक नागरिकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले. यामध्ये कोणाचे मंगळसूत्र होते; तर कोणाचे पैसे, कोणाची गाडी; त्यामुळे प्रत्येक व्यक्तीचे त्या वस्तूशी एक वेगळ्याच प्रकारचे भावनिक नाते असते. जर त्याच वस्तू परत मिळत असतील तर त्याचा आनंद सर्वांत मोठा असतो, असे अपर पोलिस आयुक्त अशोक मोराळे यांनी सांगितले. ते म्हणाले की, पोलिस तर त्यांचे काम करत असतातच; मात्र नागरिकांनी जर थोडंसं सजग राहून आपल्या सभोवती घडणाऱ्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवले आणि त्याची माहिती पोलिसांना दिली तर अनेक गुन्ह्यांना आपण वेळीच प्रतिबंध करू शकतो. यामध्ये असेही काही गुन्हे आहेत की त्यातील मुद्देमाल पोलिसांनी अवघ्या बारा तासांत हस्तगत केला आहे. पोलिसांच्या या कामगिरीचे सर्व नागरिकांनी भरभरून कौतुक केले.

कार्यक्रमास या वेळी गुन्हे उपायुक्त बच्चन सिंह, उपायुक्त मितेश घट्टे, स्वप्ना गोरे, सुहास बावचे, सहाय्यक आयुक्त शिवाजी पवार, विविध पोलिस ठाण्यांचे निरीक्षक, कर्मचारी यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### 'भाई, ये पूना पोलिस है।'

आम्ही दिल्लीला गेलो होतो. त्या वेळी आम्हाला समजले आमच्या घरात चोरी झाली आहे. सुरुवातीला आम्हाला हे खोटे वाटले; मात्र, जेव्हा पोलिसांनी व्हॉट्सअ‍ॅप व्हिडिओ कॉल करून दाखवलं तेव्हा आमच्या घरात चोरी झाली होती. चार लाख रुपयांपेक्षा अधिक मुद्देमाल चोरीस गेला होता. एक महिना आम्ही सर्व चिंतेत होतो. माहितीपण नव्हते की चोरी गेलेले दागिने परत मिळतील की नाही; मात्र ओडीसाला असताना पोलिसांचा फोन आला आणि त्यांनी सांगितले, तुमचे दागिने परत मिळाले आहेत. खरंच पुणे पोलिस खूप सतर्क आहेत. 'भाई, ये पूना पोलिस है।' असे म्हणत एका महिलेने पोलिसांचे आभार मानले.

### पोलिसांची कार्यपद्धती बदलतेय

शामसुंदर निभोरकर म्हणाले, पत्नीचं मंगळसूत्र चोरी गेले होते. घटनेची माहिती पोलिसांना देताच त्यांनी लगेच तपास सुरू केला. मला माझे अनेक मित्र म्हणायचे चोरी गेलेलं मंगळसूत्र काय मिळत असतं व्हंय. मात्र तक्रार दाखल करण्यापासून ते मंगळसूत्र परत मिळेपर्यंत पोलिसांचा आलेला अनुभव फार चांगला होता. अगदी पोलिस स्टेशनला गेल्यानंतर तेथील कर्मचाऱ्यांनी, अधिकाऱ्यांनी दाखवलेली आपुलकी व त्यानंतर पोलिस आयुक्तालयातून तुमचे काम झाले का, असे विचारणारा फोन फार दिलासा देणारा आहे; पोलिसांचे खूप खूप आभार.

**पुढारी – दि. २० ऑगस्ट, २०१९**

# दारूसाठी आले अन् पोलिसांना सापडले

## अट्टल घरफोड्या करणारे त्रिकूट जेरबंद; २३ लाखांचा मुद्देमाल हस्तगत, घरफोडीचे २७ गुन्हे उघडकीस

**पुणे : प्रतिनिधी**

रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत घरफोड्या करणाऱ्या तिघा सराइतांना गुन्हे शाखा युनिट तीनच्या पथकाने जेरबंद केले आहे. दिवसा रेकी करून बंद फ्लॅटवर डल्ला मारण्यात ही टोळी तरबेज असून हॉटेलमध्ये जाऊन मौजमजा आणि दारू पिण्याचा शौक पूर्ण करण्यासाठी त्रिकूट घरफोड्या करत होते.

जितसिंग ऊर्फ जितू राजपालसिंग टाक (वय २३, रा. वैदवाडी बिराजदारनगर), हुकुमसिंग रामसिंग कल्याणी (वय २८), अंगतसिंग अजमेरसिंग कल्याणी (वय ३४, रा. दोघेही रामटेकडी, हडपसर) अशी तिघांची नावे असून, त्यांचा अन्य एक साथीदार लखनसिंग रजपूतसिंग दुधाणी हा फरार आहे. दीड वर्षापासून शहराच्या विविध भागात ही टोळी घरफोड्या करत होती.

तिघांच्या ताब्यातून ४७ तोळे सोन्याचे दागिने, चार किलो चांदी, कार, मोटारसायकल, हत्यारे, कटावणी असा तब्बल २३ लाख सत्तावीस हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच त्यांच्याकडून शहरातील विविध भागात केलेले २७ घरफोडीचे दाखल गुन्हे उघडकीस आले आहेत. अटक करण्यात आलेले सर्व आरोपी पोलिस रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार आहेत. न्यायालयात हजर केले असता तिघांनाही २२ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

पोलिस निरीक्षक राजेंद्र मोकाशी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक राजकुमार केंद्रे, संजय गायकवाड, कर्मचारी अनिल शिंदे, संदीप राठोड, प्रवीण तापकीर यांचे पथक मागील पंधरा दिवसांपासून आरोपींच्या मागावर होते. पोलिसांनी त्यांच्या घराचीदेखील झडती घेतली होती. मात्र, ते काही पोलिसांच्या हाती लागत नव्हते. गुप्त बातमीदारामार्फत पथकाला बातमी मिळाली होती की, घरफोड्या करणारे तिघे जण पुणे-सोलापूर रोडवर रामटेकडी येथे दारू खरेदी करण्यासाठी येणार आहेत. त्यानुसार सापळा रचून तिघांना पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता, तिघांनी अनेक ठिकाणी घरफोड्या केल्याची कबुली दिली.

ही कामगिरी अपर पोलिस आयुक्त गुन्हे अशोक मोराळे, उपायुक्त बच्चन सिंह, सहायक आयुक्त शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक राजेंद्र मोकाशी, उपनिरीक्षक राजेंद्र अडागळे, कर्मचारी रामदास गोणते, सचिन गायकवाड, नितीन रावळ, बिल्सन डिसोझा, किशोर शिंदे, दत्तात्रय गरुड, दीपक मते यांच्या पथकाने केली.



पोलिसांनी जप्त केलेला चोरीच्या गुन्ह्यातील मुद्देमाल व गुन्हे शाखेचे पथक.

### शेजारच्या फ्लॅटची कडी लावून करायचे घरफोडी

ज्या परिसरात घरफोडी करायची आहे, त्या ठिकाणची अगोदरच रेकी केली जात असायची. यामध्ये जो बंद फ्लॅट आहे असाच फ्लॅट निवडला जायचा. त्यानंतर रात्रीच्या वेळी घरफोडी केली जात होती. तसेच घरफोडी करताना शेजारील घरातील व्यक्तींना कोणत्याही प्रकारचा मागमूस लागू नये यासाठी अगोदरच त्या घराची बाहेरून कडी लावण्यात येत होती.

### शौक पूर्ण करण्यासाठी करत होते घरफोड्या

तब्बल पंधरा दिवस पोलिसांचे एक पथक आरोपींच्या मागावर होते. मात्र, पोलिसांची खबर मिळताच आरोपी सतत गुंगारा देत होते. पोलिसांनी या चौघांच्या घराची झडती घेतली होती, परंतु त्यांनी पळ काढला होता. रामटेकडी परिसरात दारू खरेदीसाठी आले, त्यावेळी पोलिसांनी तिघांना सापळा रचून अटक केली. दारू पिणे, हॉटेलमध्ये जाणे, महागडे मोबाईल खरेदी करणे यासाठी तिघेही घरफोड्या करत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

**पुढारी** – दि. २४ ऑगस्ट, २०१९

# अंगडियाची २९ लाखांची रोकड चोरणारी टोळी अटकेत

**पुणे : प्रतिनिधी**

अंगडियाची २९ लाखांची रोकड लंपास करीत पोबारा करणाऱ्या टोळीला येरवडा पोलिसांनी अटक केली आहे. या वेळी त्यांच्या ताब्यातून १० लाख ५० हजारांची रोकड व चोरीत वापरलेली एक मोपेड दुचाकी असा ११ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चोरलेल्या उर्वरित तर पैशातून काही जणांनी महागडी खरेदी केल्या, तर काहींनी मौजमजा करीत गृहोपयोगी वस्तू खरेदी केल्या आहेत. तसेच सावकाराची देणीदेखील दिली आहेत.

गजानन ऊर्फ पिंटू पांडुरंग सुवर्णकार (वय ३०, रा. गुरधाळ, ता. देवणी, जि.लातूर), संदीप तानाजी बिरादार (वय २२), मंगेश रमेश बिरादार (वय २८), सुमित बालाजी पाटील (वय १९), राहुल देवीदास सूर्यवंशी (वय २०, सर्व रा. लातूर) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी विठ्ठल श्रीनिवासराव करजगीकर यांनी दि. १० ऑगस्ट रोजी येरवडा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. आरोपींना अटक करून न्यायालयात हजर केले असता चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.



अटक करण्यात आलेल्या आरोपींसह पोलिस पथक.

फिर्यादी विठ्ठल हे नांदेड येथे एका अंगडियाकडे काम करतात. ते अंगडियाने दिलेली २९ लाख २४ हजार ६५० रुपयांची रोकड घेऊन मुंबईला खासगी बसने निघाले असताना, पुण्यात येरवडा येथील मशिदीच्या शेजारील मोकळ्या जागेत बस थांबल्यावर ते लघुशंका करण्यासाठी उतरले होते. पैशांची बॅग त्यांनी पायाजवळ ठेवली होती. याच वेळी चोरट्यांनी त्यांची बॅग चोरी करत पोबारा केला होता. आरोपींना अटक करण्याची कारवाई अपर पोलिस आयुक्त सुनील फुलारी, पोलिस उपायुक्त प्रसाद अक्कानवरू, सहायक पोलिस आयुक्त रामचंद्र देसाई, वरिष्ठ पोलिस निरीक्षक युनुस शेख, पोलिस निरीक्षक गुन्हे अजय वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक मंगेश भांगे, पोलीस कर्मचारी बाळु बहिरट, हणमंत जाधव, संदीप मांजुळकर, पंकज मुसळे, अशोक गवळी यांच्या पथकाने केली.

**माजी कर्मचाऱ्याचा पराक्रम**

या टोळीचा मुख्य सूत्रधार गजानन हा असून, तो पूर्वी संबंधित अंगडियाकडे काम करत होता. मात्र, त्याचा अपघात झाल्यामुळे त्याने हे काम सोडून दिले होते. परंतु, कोणत्या दिवशी कोण? कोठून? कोठे पैसे घेऊन जातो? याची सर्व माहिती त्याला होती. त्याने गावाकडील मित्रांच्या मदतीने रोकड लुटण्याचा डाव रचला. कोणी कोणते काम करायचे हे ठरवत इतर सर्व आरोपी पुण्यात राहणाऱ्या सुमित पाटलाकडे मुक्कामाला आले. गुन्हा करण्यासाठी सुमितची मोपेड वापरण्यात आली. राहुल सूर्यवंशी याने बॅग चोरून आणली. काही गोंधळ झाला असता, तर दोघांच्या मदतीला धावून जाण्यासाठी इतर आरोपी घटनास्थळी थांबले होते. पैसे चोरल्यानंतर ते सुमितच्या घरी त्यांनी पैशाची वाटणी झाली. उपनिरीक्षक मंगेश भांगे यांच्या पथकाला आरोपी संगमवाडी पार्किंगला येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार सापळा रचून आरोपींना त्यांनी ताब्यात घेतले.

**पुढारी** – दि. २७ ऑगस्ट, २०१९

# साडेदहा लाखांची रोकड लुटणाऱ्या दोघांना अटक

- पोलिसांनी पाठलाग करून पकडले
- कर्मचाऱ्यानेच इतर साथीदारांच्या मदतीने रचला डाव

**पुणे/येरवडा : प्रतिनिधी**

कोयत्याचा धाक दाखवून एका कंपनीची डेली कलेक्शनची साडेदहा लाखांची रोकड लुटणाऱ्या दोघांना येरवडा बीट मार्शल व वाहतूक पोलिसांनी पाठलाग करून जेरबंद केले. या वेळी त्यांच्या ताब्यातून चोरी केलेली संपूर्ण रोकड हस्तगत करण्यात आली. कंपनीत काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्यानेच त्याच्या इतर दोन साथीदारांच्या मदतीने रोकड चोरीचा हा डाव रचल्याची माहिती समोर आली. ही घटना सोमवारी (दि. २६) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास संगमवाडी ब्रीज, खासगी बसथांब्याजवळ घडली.

ओंकार प्रकाश उत्तेकर (वय २४), महेश मोहन पाटोळे (वय २८, राहणार दोघेही बोपोडी) या दोघांना अटक करण्यात आली. त्यांचा तिसरा साथीदार तेजस सतीश पाटोळे (वय २४) याचा पोलिस शोध घेत आहेत. या प्रकरणी राहुल बाळासाहेब खेसे (वय २८, रा. नायगाव पुरंदर) यांनी येरवडा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार तिघांच्या विरुद्ध रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी खेसे हे ब्रिग इंडिया फायनान्स कंपनीच्या डेली कलेक्शनचे काम करतात. ते व्यापारी व फायनान्स कंपनीच्या इतर ग्राहकांचे हप्त्याचे पैसे गोळा करून कंपनीत भरतात. यानंतर कंपनी हे पैसे बँकेत भरते. नेहमीप्रमाणे हे पैसे गोळा करत असताना शेवटची कॅश शिवाजीनगर परिसरातून गोळा करण्यात आल्यावर खेसे दुचाकीवरून त्यांच्या डेक्कन कॉलेज विश्रांतवाडी परिसरातील ऑफिसकडे निघाले होते. या वेळी त्यांच्यावर पाळत ठेवत दोघा आरोपींनी त्यांना गाठले आणि दमदाटी करत त्यांच्याकडील पैशाची बॅग हिसकावली. ही बॅग घेऊन पळून जात असताना खेसे यांनी आरडाओरड केली. ती ऐकून पोलिस कर्मचारी सुशील येंद्रे यांचे लक्ष त्यांच्याकडे गेले. त्यांनी तत्काळ आरोपींच्या दुचाकीचा पाठलाग सुरू केला. त्यानंतर चौकातील वाहतूक पोलिस, जवळून जाणारे बीट मार्शल आणि इतरांनीही आरोपींच्या दिशेने धाव घेत त्यांना जेरबंद केले. रोकड लुटीची मागील दीड महिन्यातील येरवडा परिसरातील ही तिसरी घटना आहे. सदरची कामगिरी उपनिरीक्षक मंगेश भांगे यांच्या मार्गदर्शनात मांजूळकर, कुवर, सकट यांच्या पथकाने केली.

**कर्मचाऱ्यानेच रचला लुटीचा डाव**

अटक करण्यात आलेल्या तिघांपैकी तेजस पाटोळे हा ब्रिग इंडिया या कंपनीत काम करतो. त्यामुळे त्याला कोणत्या ठिकाणाहून किती रुपयांची रोकड गोळा केली जाते; त्यानंतर ती घेऊन कोणकोणत्या परिसरात जातो, याची संपूर्ण माहिती होती. त्यातूनच त्याने रोकड लुटण्यासाठी सर्व माहिती इतर दोन साथीदारांना दिली.

**पुढारी** – दि. २८ ऑगस्ट, २०१९

# पोलिसांना मारहाण करणाऱ्या चौघांना सक्तमजुरीची शिक्षा



## संबंधितांचा गुन्हा व्यवस्थेविरोधात

संबंधितांनी केलेला गुन्हा हा व्यवस्थेच्या विरोधात आहे. त्यांना कमी शिक्षा दिली तर समाजात वेगळा संदेश जाईल. पुण्यात गेल्या काही दिवसांपासून सरकारी कामकाजात अडथळा आणि त्यांना मारहाण केल्याचे प्रकार वाढत आहेत. त्यामुळे या प्रकारांना आळा बसण्यासाठी दोषींना जास्तीत जास्त शिक्षा देणे गरजेचे असल्याचे मत न्यायालयाने व्यक्त केले.

**पुणे : प्रतिनिधी**

चित्रपटगृहात झालेला गोंधळ शांत करण्यासाठी गेलेल्या पोलिसांना मारहाण करणाऱ्या चौघांना न्यायालयाने तीन वर्षे सक्तमजुरी आणि प्रत्येकी ५०० रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली आहे. सहायक सत्र न्यायाधीश एस. पी. पिंगळे यांनी हा आदेश दिला आहे.

प्रमोद ज्ञानोबा धुमाळ, प्रवीण बाळासाहेब बांदल, आनंद आबू धुमाळ आणि प्रसाद चंद्रकांत गुजले (सर्व रा. उत्तमनगर) अशी शिक्षा सुनावण्यात आलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी हवेली पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार प्रशांत गुलाब वाबळे यांनी फिर्याद दिली होती. खटल्याचे कामकाज अतिरिक्त सरकारी वकील प्रमोद बोंबटकर यांनी पाहिले. त्यांनी एकूण नऊ साक्षीदार तपासले. त्यांना न्यायालयीन कामकाजासाठी पोलिस रूपाली पवार यांनी मदत केली. दि. १ जून २०१२ रोजी रोजी रात्री १० वाजता अभिरुची मॉलमधील सिनेमागृहात राउडी राठोड हा सिनेमा सुरू असताना ३० ते ४० मुलांनी आरडाओरडा सुरू असून त्यांच्यात भांडणे सुरू आहेत, अशी माहिती तेथील व्यवस्थापकाने स्थानिक पोलिसांनी दिली. त्यामुळे नेमका काय प्रकार झाला आहे हे, पाहण्यासाठी फिर्यादी व पोलिस हवालदार संतोष कालेकर, दिलीप सुपे आणि अक्षय गिरि आदी मॉलमध्ये गेले. चित्रपटगृहात सुरू असलेला गोंधळ तसेच तरुणांमधील भांडणे मिटविण्याचा प्रयत्न केला. मात्र, आरोपींनी पोलिसांना माज आलाय त्यांच्याकडे पाहा, आम्ही उत्तमनगरचे किंग आहोत, आम्ही पोलिसांना घाबरत नाही', असे म्हणत शिवीगाळ व मारहाण केली. आरोपींपैकी एकाने सिनेमागृहातील खुर्ची सुपे व कालेकर यांच्या डोक्यात घातली. तर फिर्यादी व गिरि यांना हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. हा प्रकार झाल्यानंतर फिर्यादी यांनी इतर पोलिसांना बोलावून घेतले. त्यांनी आरोपींना ताब्यात घेऊन चौकीत नेले. तेथे त्याच्यावर गुन्हा दाखल होऊन आरोपपत्र दाखल करण्यात आले. खटल्यात सरकारी वकील बोंबटकर यांनी दोषींना जास्तीत जास्त शिक्षा देण्याची मागणी केली.

**पुढारी – दि. २८ ऑगस्ट, २०१९**

# आठ महिन्यांत ५० घरफोड्या; टोळी गजाआड

- चौघे जेरबंद ; ८१ लाखांचा मुद्देमाल केला जप्त
- वेगवेगळ्या शक्कल लढवून करीत असत घरफोड्या
- चोरीचा माल घेणारा सोनारही जाळ्यात

**पुणे: प्रतिनिधी**

धारदार शस्त्रासह चोरीच्या वाहनांचा वापर करून अतिशय सफाईदारपणे घरफोड्या करणाऱ्या सराइतांच्या टोळीला वानवडी पोलिसांनी जेरबंद केले आहे. पुणे शहर, पिंपरी-चिंचवड व ग्रामीण परिसरात या टोळीने अनेक प्रकारचे गुन्हे केले आहेत.

उजालासिंग प्रभूसिंग टाक (२७), गोरखसिंग गागासिंग टाक (वय २९), बल्लूसिंग प्रभुसिंग टाक (वय ३०), जलसिंग रजपूतसिंग दुधानी (२६, सर्वजण रा. रामटेकडी, हडपसर), सत्यनारायण देवीलाल वर्मा (वय ४३, रा. लोणी काळभोर) अशी अटक केलेल्यांची नावे आहे. हे सर्व पोलिस रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार आहेत. आरोपींच्या ताब्यातून एक किलो सोने, १० किलो चांदी, ३ लाख रोकड, चारचाकी वाहने ६ वाहने, एक दुचाकी, एक विदेशी बनावटीचे पिस्टल, ६ जिवंत काडतुसे, घरफोडीचे साहित्य असा ८१ लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. या टोळीकडून शहरातील तब्बल ५० गुन्हे उघडकीस आले आहेत. हे सर्व गुन्हे चालू वर्षात जानेवारीपासून आजपर्यंतच्या कालावधीत केलेले आहेत. या वेळी पोलिसांनी चोरीचा माल खरेदी करणाऱ्या लोणी काळभोर परिसरातील एका सोनारालादेखील अटक केली आहे.

दरम्यान, मागील दोन दिवसांपूर्वी दैनिक 'पुढारी'ने शहरातील पूर्व भागात सर्वाधिक गुन्हेगारी या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध करून पोलिसांच्या 'परिमंडळ पाच'च्या हद्दीत कशा प्रकारे गुन्हेगारी वाढत आहे. ही गुन्हेगारी वाढण्यामागे कोणती कारणे आहेत, याचे विश्लेषण केले होते. तसेच, शहरात ऐंशी टक्क्यांपेक्षा अधिक घरफोड्या करणारे गुन्हेगार याच परिसरात वास्तव्यास असल्याचेदेखील नमूद केले होते.


शहराच्या पूर्व भागात सर्वाधिक गुन्हेगारी!

**पुढारी इफेक्ट**

वानवडी पोलिस ठाण्यासह शहराच्या इतर भागांत मागील काही दिवसांपासून घरफोड्या, वाहनचोरी, जबरी चोरी अशा गुन्ह्यांचे प्रमाण वाढले होते. त्यामुळे गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यासाठी परिमंडळ पाचच्या उपायुक्तांनी वानवडी पोलिस स्टेशनची दोन पथके तपासासाठी तयार केली. त्यामध्ये संबंधित आरोपी हे रामटेकडी येथील असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार गोरखसिंग व उजाला हे दोघेजण रामटेकडी येथील अंधशाळेच्या पाठीमागे असल्याची खबर पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. चौकशीमध्ये बल्लूसिंग व जलसिंग हे दोघे धुळे येथे गेले होते. पोलिसांनी धुळे येथील दण्डेलबाबा वस्ती रेल्वे मार्गालगत सलग तीन दिवस सापळा रचून त्यांना अटक केली. सीसीटीव्ही फुटेजद्वारे आरोपी निश्चित करणाऱ्या महेश कांबळे, नवनाथ खताळ, नासीर देशमुख आणी सुधीर सोनवणे यांना सहायक पोलिस आयुक्त रवींद्र सिसवे यांनी प्रत्येकी दहा हजारांचे बक्षीस जाहीर केले.

ही कारवाई पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम, सहायक पोलिस आयुक्त रवींद्र सिसवे, अपर पोलिस आयुक्त सुनील फुलारी, पोलिस उपायुक्त सुहास बावचे, सहायक पोलिस आयुक्त सुनील कलगुटकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक क्रांतीकुमार पाटील, पोलिस निरीक्षक सलिम चाऊस, तपास पथकाचे अधिकारी राजेंद्र गायकवाड यांच्या पथकाने केली.


जप्त करण्यात आलेला चोरीतील मुद्देमाल

### शक्कल लढवून करीत असत घरफोड्या

ज्या परिसरात घरफोडी करायची आहे, त्या ठिकाणची अगोदर रेकी केली जात असे. एवढेच नाही तर बंद घराच्या लॉकवर किती धूळ साचली आहे. यावरून ही टोळी घर किती दिवस बंद आहे, याचा अंदाज लावत असे. शहरातील अनेक ठिकाणी सध्या सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. त्यामुळे आपण कॅमेऱ्यात कैद होऊ नयेत, म्हणून टोळीतील चोरटे चालण्याची चालसुद्धा बदलत होते. त्यामुळे अनेक दिवसांपासून ते पोलिसांना गुंगारा देण्यात यशस्वी ठरत होते.

### स्वत:वर ब्लेडने वार करीत पोलिसांवर हल्ला

धुळ्यात बल्लूसिंगला अटक करीत असताना झालेल्या झटापटीमध्ये त्याने पगडीत ठेवलेल्या ब्लेडने स्वत:च्या छातीवर व गळ्यावर वार करून घेतले. त्याच्या हातातून ब्लेड काढून घेत असताना पोलिस शिपाई सोनवणे याच्या हाताला जखम झाली. दरम्यान, रामटेकडी येथे अटक केलेल्या आरोपींकडून माहिती मिळाल्यानंतर धुळ्यात अटक करण्यासाठी गेलेल्या पथकावर दोघांनी ब्लेडने हल्ला केल्याची घटना घडली आहे. मात्र, अशा परिस्थितीतदेखील पोलिसांनी आरोपींच्या मुसक्या आवळल्या.

### पोलिसांनी तपासले ४१ ठिकाणचे सीसीटीव्ही

आरोपींना अटक करण्यासाठी पोलिसांनी शहरातील तब्बल ४१ ठिकाणचे सीसीटीव्ही कॅमेरे तपासले. प्रत्येक वेळी कोणत्या कॅमेऱ्यात आरोपींच्या हालचाली दिसत आहेत, याची बारीक नोंद त्यांनी केली. हे आव्हानात्मक काम वानवडी पोलिस ठाण्याचे कर्मचारी महेश कांबळे, नवनाथ खताळ, नासिर देशमुख आणि सुधीर सोनवणे यांनी केले. यासाठी त्यांना शहरातील तीस पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सीसीटीव्ही फुटेज तपासावे लागले.

पुण्यनगरी – दि. १२ ऑगस्ट, २०१९

# वाहनचोर युवती जेरबंद; पुण्यातील पहिलीच घटना

**पुणे : प्रतिनिधी**

गुन्हे शाखेच्या युनिट-१ ने दुचाकी चोरणाऱ्या युवतीला अटक केली आहे. २५ हजार रुपये किमतीची होंडा कंपनीची डिओ मोटार सायकल तिच्याकडून जप्त केली आहे. वाहने चोरण्याच्या गुन्ह्यात शहरात पहिल्यांदाच एका महिलेला अटक केली आहे. मुग्धा अभयकुमार कोडीलीकर (वय २०, रा. श्रीविहार सोसायटी, नऱ्हेगाव) असे अटक केलेल्या युवतीचे नाव आहे.

युनिट १ मधील पोलीस हवालदार अजय थोरात यांना जगताप हॉस्पिटल सिंहगड रोड येथून दुचाकी चोरी करणारी संशयित युवती तिच्या घरी असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने तिच्या घरी जाऊन संशयीत युवतीस ताब्यात घेऊन चौकशी केली. त्यावेळी तिने वापरत असलेली दुचाकी दोन महिन्यांपूर्वी जगताप हॉस्पिटल, सिंहगड रोड येथून चोरल्याची कबुली दिली. सदरची २५ हजार रुपये किमतीची मोटार सायकल तिच्याकडून जप्त केली. या दुचाकी चोरणाऱ्या युवतीस पुढील चौकशीसाठी सिंहगड रोड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कामगिरी युनिट-१ चे पोलीस निरीक्षक गजानन पवार, पोलीस कर्मचारी अजय थोरात, अमोल पवार, वैभव स्वामी, अनिल घाडगे, महिला पोलीस कर्मचारी आरती कांबळे यांनी केली आहे.

# सराइताकडून रिक्षासह सहा दुचाक्या जप्त

■ **पुणे** : वाहनचोरी करणाऱ्या सराईत चोरट्यास खडक पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडे तपास करून विविध पोलीस ठाण्यांतील वाहनचोरीचे सात गुन्हे उघडकीस आणून एक रिक्षा आणि सहा दुचाक्या हस्तगत केल्या आहेत. अल्फेश शरीफ मुलाणी (वय २३, रा. ५४, ईपी लोहियानगर) असे अटक केलेल्याचे नाव आहे. टिंबर मार्केट भागात काही दिवसांपूर्वी ऑटोरिक्षा चोरून नेली होती. याप्रकरणी खडक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर तपास पथक चोरट्याचा शोध घेत होते. रिक्षा चोरणारा संशयित आरोपी हा लोहियानगर भागात आल्याची माहिती खडक पोलीस ठाण्यातील पोलीस शिपाई समीर माळवदकर आणि संदीप कांबळे यांना मिळाली. त्यानुसार खडक पोलिसांच्या पथकाने सापळा रचून आरोपी अल्फेश मुलाणी यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने रिक्षा चोरून नेल्याचे कबूल केले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक भरत जाधव, पोलीस निरीक्षक उत्तम चक्रे, तपास पथकाचे उमाजी राठोड, विनोद जाधव, गणेश सातपुते, संदीप पाटील, प्रमोद नेवसे, राकेश क्षीरसागर यांनी ही कामगिरी केली. पोलिसांनी त्याला अटक करून तपास केला असता खडक २, दत्तवाडी, अलंकार, सहकारनगर आणि कोथरूड पोलीस ठाणे हद्दीतून प्रत्येकी एक अशा एकूण ६ दुचाक्या चोरल्याचे उघडकीस आले. त्याच्याकडून ३ लाख १० हजार रुपये किमतीची वाहने जप्त केली आहेत.

पुण्यनगरी – दि. २५ ऑगस्ट, २०१९

# येरवडा लुटीतील ११ लाखांची रोकड जप्त

पुणे : प्रतिनिधी

येरवडा परिसरात कुरिअर मालकाची २९ लाख रुपयांची रक्कम ठेवलेली सॅक दुचाकीवरून आलेल्या दोघांनी चोरून नेली होती. येरवडा पोलिसांनी या गुन्ह्याची उकल करीत पाचजणांना अटक केली असून, साडेदहा लाख रुपयांची रोख रक्कम आणि दुचाकी असा ११ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. कुरिअर कंपनीत पूर्वी काम करणाऱ्या कामगारानेच इतर साथीदारांच्या मदतीने हा गुन्हा केला असल्याची माहिती पोलीस उपायुक्त प्रसाद अक्कानवरू यांनी दिली.



संदीप बिरादार (वय २२, रा. नाईक चौक, उदगीर), मंगेश बिरादार (वय २८, लोहारा, ता. उदगीर), सुमीत पाटील (वय १९, ता. उदगीर), राहुल सूर्यवंशी (वय ३०, ता. जळकोट) आणि गजानन ऊर्फ पिंटू पांडुरंग सुवर्णकार (वय ३०, ता.देवणी, जि. लातूर) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. त्यांचा साथीदार संभाजी कुटगावे याचा पोलीस शोध घेत आहेत.

नांदेड येथून कुरिअर कंपनीच्या मालकाने दिलेली २९ लाख २४ हजार रुपयांची रक्कम फिर्यादी विठ्ठल करजगीकर हे मुंबई येथे घेऊन जात होते. दरम्यान, खासगी बसने प्रवास करून ते १० ऑगस्ट रोजी सकाळी येरवडा परिसरात उतरले आणि लघुशंका करीत असताना त्यांच्याजवळील रकमेची सॅक चोरट्यांनी हिसकावून नेली होती.

सॅक हिसकावून पळून जाणारे चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले होते. त्यावरून पोलिसांनी आरोपींचा माग काढला. ते संगमवाडी पार्किंग येथून खासगी बसमधून लातूर येथे मूळगावी पळून जाणार असताना येरवडा पोलिसांच्या तपास पथकाने गुरुवारी (दि. २२ ऑगस्ट) सुमीत पाटील आणि राहुल सूर्यवंशी या दोघांना पकडले.

सहायक पोलीस आयुक्त रामचंद्र देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक युनूस शेख, पोलीस निरीक्षक अजय वाघमारे, तपास पथकाचे उपनिरीक्षक मंगेश भांगे, कर्मचारी बाळू बहिरट, हणमंत जाधव, संदीप मंजुळकर, पंकज मुसळे, अशोक गवळी, मनोज कुदळे आदींच्या पथकाने ही कामगिरी केली.

## पूर्वीचा कामगार निघाला सूत्रधार

आरोपी गजानन ऊर्फ पिंटू हा पूर्वी फिर्यादीच्या मालकाच्या कुरिअर कंपनीत काम करीत होता. मात्र, काही महिन्यांपूर्वी अपघात झाल्याने त्याने काम सोडले होते. त्याला ऑफिसमधील पैसे कोणत्या मार्गाने कोठे जातात याची माहिती होती. इतर आरोपींच्या मदतीने रक्कम लुटण्याचा कट रचला. आरोपींपैकी सुमीत पाटील पुण्यात राहात असल्याने त्याच्या दुचाकीचा गुन्हा करण्यासाठी वापर केला. राहुल सूर्यवंशी याने सॅक हिसकावली.

## लुटीच्या रकमेतून फेडले कर्ज, म्हशी घेतल्या

गुन्ह्यातील सर्व आरोपी लातूर जिल्ह्यातील आहेत. २९ लाखांची रोकड लुटल्यानंतर काही रक्कम त्यांनी मौजमजा करण्यासाठी उडविली. आपापसात वाटून घेतलेल्या रकमेत कुणी खासगी सावकाराचे कर्ज फेडले, तर काहींनी म्हशी विकत घेतल्याचे तपासात उघडकीस आले आहे.

# Four arrested for cheating elderly women

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**PUNE**
The officials of Crime Branch Unit 1 of Pune city police have arrested four persons and detected seven cases of cheating elderly persons by fooling under the pretext of making replicas of their gold ornaments. The police have recovered ornaments worth Rs 6.54 lakh.

DCP (Crime) Bachchan Singh said, "Four accused persons from Baramati have been arrested. They used to gain access in the house under the pretext of selling milk products and later ask for jewellery worn by senior citizens for making their replicas and used to abscond with the jewellery."

While investigating these cases, policemen Yogesh Jagtap, Mallikarjun Swami and Sudhakar Mane, had received a tip-off about the suspects' presence in Baramati. Accordingly, a team was sent there which arrested the accused persons.



**ON THE RIGHT TRACK:** Officials of Crime Branch during a press conference on Monday.

The arrested persons have been identified as Ashok alias Kantya Vishwanath Gangavane (27), Navnath Vishnu Waikar (25), Lankesh Popat Waikar (22) and Sunil Somnath Waikar (30).

According to the police, these accused persons used to approach elderly women pretending to be sellers of colostrum and ghee. "While talking to women, they used to win over their confidence. They would make an excuse that their brother is getting married soon and their mother who is waiting downstairs would like to make a gold chain/jewellery just like the one worn by the victim. They would take the ornament from the victim under the pretext of showing to their mother and then decamp from there," PSI Dinesh Patil said.

Besides the ornaments worth Rs 6.54 lakh, the police have also seized four bikes worth Rs 3.86 lakh from the accused persons.

The investigation team included senior Police Inspector Arun Waikar, PSI Uttam Budgude, Hanumant Shinde and policemen Prakash Lokhande, Anil Ghadge, Ajay Thorat, Prashant Gaikwad, Amol Pawar, Subhash Pingale, Baba Chavan, Tushar Malwadkar, Rizwan Jinedi, Sanjay Barkade, Shrikant Waghawle, Umesh Kate, Irfan Momin, Imran Shaikh, Tushar Khadke, Sachin Jadhav, Ashok Mane, Vijesing Wasave and Kailash Giri.

Sakal Times - 23 August, 2019

# Gang which robbed bus passengers arrested

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com




**THE LOOT:** The officials of Crime Branch with the recovered valuables worth Rs 4.66 lakh.

**PUNE**
Sleuths from Crime Branch Unit 2 of Pune city police arrested five persons allegedly involved in theft of valuables from passengers on Pune Mahanagar Parivahan Mahamandal Limited (PMPML) buses.

DCP (Crime Branch) Bachchan Singh said, "Our team recovered Rs 30,000 cash and 107 grams of gold ornaments from possession of the accused persons.

The total worth of the recovery is Rs 4.66 lakh. We solved 14 cases of thefts in PMPML buses with these arrests."

A team, under guidance of Police Inspector Gajanan Pawar, travelled extensively on buses to keep a watch on the suspects. The five persons were caught as they planned to board a bus at the Pune railway station bus stop.

The arrested persons were identified as Krushna alias Anna Popatrao Gavhane (24) of Wagholi, Akash alias Akkya Shivaji Ahiwale (20) of Dhankawadi, Mangesh alias Mangya Suresh Ukrande (18) of Wagholi, Suraj Kishor Sonawane (21) of Kharadi and Hukumsingh Rajsingh Bhati (47) of Kharadi.

The police said the gang was led by Suraj Sonawane, while Bhati used to buy the stolen ornaments. The gang targeted passengers who boarded buses at crowded places under the jurisdictions of Swargate, Lashkar, Sinhagad, Yerwada, Wanawadi and Shivajinagar police stations.

सामना – दि. १० ऑगस्ट, २०१९

# पोलिसांकडून नागरिकांना सव्वा कोटीचा ऐवज परत

## १२ वाहने, २८ मोबाईल, दागिन्यांचा समावेश

पुणे, दि. १० (प्रतिनिधी) – शहरातील विविध भागांत झालेल्या चोरीच्या गुन्ह्यांतील तब्बल एक कोटी १८ लाखांचा ऐवज पोलिसांच्या वतीने नागरिकांना पुन:प्रदान करण्यात आला आहे. त्यामध्ये सोन्या-चांदीचे दागिने, १२ वाहने, २८ मोबाईलचा समावेश आहे.

पोलीस आयुक्तालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलीस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम, गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, पोलीस उपायुक्त बच्चन सिंह, पोलीस उपायुक्त मितेश घट्टे, स्वप्ना गोरे, सुहास बावचे, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी पवार, विविध पोलीस ठाण्यांचे पोलीस निरीक्षक, कर्मचारी यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

पोलिसांनी विविध चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करून ७३ गुन्ह्यांतील एक कोटी १८ लाखांवर ऐवज नागरिकांना परत केला आहे. तसेच चोरट्यांकडून जप्त केलेला ऐवज मूळ मालकांना तत्काळ परत देण्यासाठी न्यायालयात पाठपुरावा केला. त्यामुळे दागिन्यांसह वस्तूंचा ऐवज परत मिळविताना अनेक नागरिकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. त्यामध्ये सोनसाखळी, मंगळसूत्र, दुचाकींचा समावेश होता. प्रत्येक नागरिकाचे वस्तूंमध्ये एक वेगळ्याच प्रकारचे भावनिक नाते असते. जर त्याच वस्तू परत मिळत असतील, तर त्याचा आनंद मोठा असतो, असे मत अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे यांनी व्यक्त केले. नागरिकांनी थोडेसे सजग राहून सभोवताली घडणाऱ्या हालचालींची माहिती पोलिसांना दिल्यास गुन्ह्यांचा वेळीच प्रतिबंध केला जाऊ शकतो. तसेच सोसायटी, दुकानांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविल्यास गुन्हे उघडकीस येण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.



### यह पूना पुलिस हैं...

कुटुंबीयांसह दिल्लीला गेल्यानंतर पुण्यातील घरात चोरी झाल्याचे समजले. त्यावेळी चोरट्यांनी घरातून चार लाखांपेक्षा अधिक ऐवज चोरून नेला. एक महिना आम्ही सर्व चिंतेत होतो. कारण चोरीला गेलेले दागिने परत मिळतील का नाही, याबद्दल साशंकता होती. मात्र, काही दिवसांनंतर पुणे पोलिसांचा फोन आला आणि त्यांनी तुमचे दागिने परत मिळाले असल्याचे सांगितले. त्यामुळे पुणे पोलीस खूप सतर्क असून, सखोल तपास करीत चोरट्यांच्या ताब्यातून आमचे दागिने मिळवून दिले. 'यह पूना पुलिस हैं...' असे म्हणत महिलेने पोलिसांचे आभार मानले.

सामना – दि. ३० ऑगस्ट, २०१९

# तरुणाला लुटणाऱ्या रिक्षाचालकाला अटक

पुणे, दि. २९ (प्रतिनिधी) – तरुणाला शिवीगाळ करीत मारहाण करून जबरदस्तीने लुटणाऱ्या एका रिक्षाचालकाला फरासखाना पोलिसांनी अटक केली आहे. ही घटना आठ दिवसांपूर्वी बुधवार पेठ ते साधू वासवानी चौकादरम्यान घडली होती.

संतोष गुलाब नामदास (वय ३४, रा. काळेपडळ, हडपसर) असे अटक केलेल्याचे नाव असून, त्याचा साथीदार फरार झाला आहे. याप्रकरणी कुमार सातपुते (वय २३, रा. सदाशिव पेठ) यांनी फिर्याद दिली आहे.

कुमार आठ दिवसांपूर्वी रिक्षातून पुणे स्टेशनला चालले होते. त्यावेळी रिक्षाचालक संतोषने कुमार यांना पुणे स्टेशनला न सोडता साधू वासवानी चौकातून आर्मी एरिया परिसरात नेले. त्या ठिकाणी शिवीगाळ करीत त्यांना मारहाण करून जबरदस्तीने खिशातील एक हजार २५० रुपये काढून घेत संतोष फरार झाला होता. फरासखाना पोलीस तपास करीत आहेत.

TIMES OF INDIA Date 28 August, 2019

# Four held for cheating finance firm of ₹6.91 crore

**Pune:** The economic offences wing on Tuesday arrested four people, including two officials and a consultant of a private finance company, for taking home loan for a property in Purandar taluka using bogus papers and duping the firm of Rs 6.91 crore in the past few months.

Deputy commissioner of police (EOW) Sambhaji Kadam said the police had arrested the landowner, Chandrakant Damu Maidad of Mumbai, besides, Prashant Dattatray Mukte (37) of Somwar Peth, Vishal Temgire (30) of Kothrud and Pravin Dashrath Sawant (42) of Navi Mumbai — all associated with the finance firm in some capacity.

Kadam said six more people had been booked in this case. "The role of many others is being investigated," he said.

A case of cheating and forgery has been filed with the Dattawadi police against the 10 people. Senior inspector (EOW) Vijaykumar Tambture lodged a complaint against the suspects.

## FAKE HOME LOAN

"The landowner, the local revenue officers, the legal advisors and land valuators are involved in the cheating case. Thus, the police have become the complainant."

Kadam said the arrested landowner, Maidad, got in touch with an officer of the finance company stating that he was venturing into plot development in Purandar taluka. The project was supposed to come up at Mauje Khanwadi village.

The suspects then conspired together and prepared fake land documents, fake valuation certificate, fake non-agriculture (NA) land certificates and other documents, Kadam said. "The study of the crime revealed that the land is still agriculture zone and not NA," he said.

Kadam said the suspects prepared fake home loan proposals submitting the fabricated documents in the finance company's Pune office at Sadashiv Peth. "All the loan proposals were processed by the company officials and loans were disbursed to the applicants, who were actually the landowner, company officials and others," he said.

The landowner and others prepared many home loan proposals similarly, submitted them in the company's office and borrowed Rs 6.91 crore.

# अभिप्राय...

मा. वरिष्ठ पो. निरीक्षक सो.
कोंढवा पोलीस स्टेशन, पुणे.
यांना सविनय सादर

रिपोर्ट - श्री. एम. पाडळे पोलीस उपनिरीक्षक, कोंढवा पोस्टे यांजकडून.

विषय - दर्पण पुस्तकाबाबत.

दर्पण हा उपक्रम सुरु झाल्यापासून पोलीसांनी केलेल्या, ~~का~~ चांगल्या कामगिरीबद्दल लोकांना माहिती मिळते. या उपक्रमामुळे पोलीस व जनता यांच्यातील संबंध अधिक सुधारण्यास मदत होत आहे. जनतेचा व सामान्य लोकांचा पोलीसांवरचा विश्वास अधिक बळकट होत आहे. मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी सुरु केलेला दर्पण हा उपक्रम प्रशंसनीय असून तो पोलीसांसाठी व जनतेसाठी उपयुक्त असून मोलाचे मार्गदर्शक असा ठरला आहे.

मा. सादर सो.
दि. 18/05/19.
[signature]
पोलीस उपनिरीक्षक
कोंढवा पो. स्टे. पुणे शहर

---

**सहकारनगर पोलीस ठाणे**

**दर्पण पुस्तिका अभिप्राय**

१) पोलीस कर्मचारी याचे पुर्ण नाव :- मिनाक्षी जितेंद्र महाडिक

२) पदनाम :- महिला पोलीस नाईक

३) बक्कल नंबर :- ५८८३

४) नेमणुकीचे ठिकाण :- सहकारनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर

५) दर्पण पुस्तिकेबाबत आपला प्रतिक्रियात्मक अभिप्राय / मत :-

माननिय महोदय,
दर्पण पुस्तिकांचे वाचन केले. मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांची कल्पना पोलीस दलातील अधिकारी / कर्मचारी, नागरिक यांना उत्कृष्ठ कामगिरी करण्यास प्रोत्साहन देणारी आहे. पोलीस आयुक्तालयांतर्गत येणाऱ्या पो. स्टेला दाखल गुन्हे, त्यांची थोडक्यात माहिती, तपासाबाबतची माहिती, पोलीसांकडून करण्यात येणाऱ्या चांगल्या कामगिरी दर्पण या पुस्तिके मार्फत वाचण्यास मिळाली. दर्पण पुस्तिके मार्फत संकलित माहिती पुढे येणाऱ्या पोलीस बांधवांना प्रेरणा देणारी असेल. या पुस्तिकेचा संग्रह होणे आवश्यक आहे असे आवर्जून वाटत आहे. तसेच मा. पोलीस आयुक्त सरांची सदरची संकल्पना दैनंदिन कामकाजाकरिताही उपयोगी ठरेल. धन्यवाद सर.

दिनांक :- २९.०५.२०१९

Mahadik
LPN 5991.
स्वाक्षरी


Man arrested for estranged girlfriend's murder attempt
Will act against illegal private security firms warns police chief
बिबवेवाडीमध्ये सीसीटीव्हीचे लोकार्पण
बिबवेवाडी पोलिसांनी पाठलाग करून जप्त केली ३५० लिटर दारु
चालक व मालकांवर कारवाई करणार
अश्लील चाळे करणाऱ्या महिलांवर कारवाई
शाखेकडून गुंडांची झाडाझडती
वाहनांची तोडफोड करणारे गजाआड, पाच तासांत अटक
पाच जणांच्या टोळीला अटक
पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याच्या होते तयारीत
मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय
चार किलो गांजासह आरोपीला अटक
धक्का लागला म्हणून कोयत्याने वार; तिघे जेरबंद
कर्ज फेडण्यासाठी झाला 'तो' साखळीचोर
पुरुषांपेक्षा पोलिसांवर महिलांचा विश्वास
महिला सुरक्षेसाठी 'दामिनी टू' पथक
पोलिसांना मदत करणाऱ्या संस्थांचा सन्मान
कमी किमतीत बुलेट देण्याचे आमिष
गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या तिघांना अटक
पोलीस बांधवांप्रति आदराची भावना बाळगा : अमृत पठारे
पोलिसांसह साजरा झाला मैत्री दिवस
नात्यांमध्ये सुसंवाद ठेवणे आव्हानात्मक
पोलिस ठाण्यांत आता 'सीपीओ'
पोलिस आणि नागरिकांमधील दुवा म्हणून करणार काम; आयुक्तांचा उपक्रम
चोरीला गेलेला मुद्देमाल पुन्हा मिळताच चेहऱ्यावर फुलले हसू
Cops bust gang for duping finance cos of ₹4.5 crore
सुखकर्ता पुरस्काराचे वितरण उत्साहात
उत्सवात बेशिस्तीचे 'थर' नकोच
एका ढोल ताशा पथकाला एकाच मंडळात सहभागी होता येणार
नागरिकांच्या वॉर्डस्तरीय निधीतून संपूर्ण शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणार
हरविलेली बालके अखेर विसावली आईच्या कुशीत
Gang duping people with promise of real American dollars nabbed
अशिक्षितांचा पोलिसांवर विश्वास
सोशल मीडियामुळे सापडला हरवलेला
संक्षिप्त
दामिनींनी केले पाकीट परत
एका ढोल ताशा पथकाला एकाच मंडळात सहभागी होता येणार
पोलीस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे : विसर्जन
सराईत चोरट्याकडून २४ मोबाइल हस्तगत
गुन्हेगारी रोखण्यासाठी नागरिकांचा सहभाग आवश्यक
भरपावसात बालकाला मंदिरात सोडून पित्याचा पळ
विद्यार्थ्यांनी वाहतुकीच्या नियमांची जागृती करावी
राजेश पुराणिक : रामचंद्र महाविद्यालयामध्ये रस्ता सुरक्षा सप्ताह कार्यक्रम
हडपसर पोलीस स्टेशनमध्ये रक्षाबंधन
हेल्मेटमुळे वाचले वाहतूक पोलिसांचे
आईनेच केला चिमुकल्याच्या अपहरणाचा बनाव
गरिबीमुळे सांभाळ अशक्य, म्हणून दिले होते ओळखीच्या दाम्पत्याकडे
इंजिनिअर 'लखोबा लोखंडे' अखेर जेरबंद